ज्ञान आमुचे शस्त्र असावे,
सत्य आमुचा श्वास;
अन्यायाच्या अंधाराला
देऊ प्रकाशाचा ध्यास.

हातामध्ये पुस्तक घेऊ,
डोळ्यांत नवे स्वप्न;
संविधानाचा दीप उजळू,
बदलू काळाचे दर्पण.

वादळाशी मैत्री करून,
चालू निर्भय वाट;
भिंती सारे कोसळतील,
जागा होईल घाट.

ज्यांनी इतिहास घडविला,
त्यांचा आम्हा वारसा;
समता, स्वातंत्र्य, बंधुतेचा
हाच विजयघोष खासा.

भीतीच्या त्या साखळदंडांना
आज उधळू सारे;
विद्यार्थ्यांच्या एकजुटीने
फुलतील उद्याचे तारे.

विद्रोह आमुचा द्वेषासाठी नव्हे,
मानवतेच्या मानासाठी;
आवाज आमुचा क्रांतीसाठी नव्हे,
न्यायाच्या नव्या पहाटेसाठी.

उठा युवा हो, जागा व्हा रे,
ज्ञानज्योती हातामध्ये;
नवा इतिहास लिहू या आता,
परिवर्तनाच्या रक्तामध्ये.



बहिर्जी स्मारक महाविद्यालय

सत्यशोधक विद्यार्थी चळवळी विशेषांक २०२५-२०२६

# बहिर्जी स्मारक महाविद्यालय

वसमत, जि. हिंगोली

जेव्हा विद्यार्थी जागा होतो, तेव्हा इतिहास दिशा बदलतो

NSUI
SFI
AISF
BVS
AISA

# सत्यशोधक

## विद्यार्थी चळवळी विशेषांक

२०२५-२०२६



# सत्यशोधक

## विद्यार्थी चळवळी विशेषांक

२०२५-२०२६

हु. बहिर्जी स्मारक महाविद्यालय

वसमत, जि. हिंगोली

# सत्यशोधक

**विद्यार्थी चळवळी विशेषांक**

२०२५-२०२६


- **विद्यार्थी संपादक मंडळ**
  सानिका मगर (बी.एस्सी. द्वितीय)
  प्रगती टाकणखार (बी.एस्सी. द्वितीय)
  सम्राट सरोदे (बी.एस्सी. द्वितीय)
  गायत्री कांबळे (बी.ए. प्रथम)
  सुप्रिया पुंड (बी.ए. प्रथम)
  शारदा डुकरे (बी.कॉम. द्वितीय)

- **विशेषांक मार्गदर्शक**
  प्रा. डॉ. बी.बी. खंदारे (प्रमुख)
  प्रा. डॉ. आर.बी. कावळे
  प्रा. प्रदीप इंगोले
  प्रा. अनिल कल्याणकर

- **प्रकाशक**
  प्राचार्य,
  बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
  वसमतनगर, जि. हिंगोली

- **मुखपृष्ठ/मांडणी**
  विजयकुमार चित्तरवाड
  राजेश्वर क्रिएशन्स्, नांदेड

- **मुद्रण**
  आर्टी ऑफसेट, लातूर



या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ व महाविद्यालय प्रशासन सहमत असेलच असे नाही.



# प्राचार्यांचे मनोगत

## विद्यार्थी चळवळ : परिवर्तनाच्या चेतनेचा जागर

''विद्यार्थी'' हा शब्द केवळ शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीचा परिचय देत नाही; तर तो स्वप्न पाहणाऱ्या, प्रश्न विचारणाऱ्या, सत्याचा शोध घेणाऱ्या आणि समाजाला नवी दिशा देण्याचे सामर्थ्य बाळगणाऱ्या सजग नागरिकाचा परिचय आहे. इतिहास साक्षी आहे की, जगातील प्रत्येक मोठ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी विद्यार्थी शक्ती उभी राहिली आहे. विचारांची क्रांती असो, स्वातंत्र्यलढा असो, सामाजिक न्यायाची चळवळ असो किंवा लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाची लढाई असो विद्यार्थ्यांनी प्रत्येक वेळी परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे. म्हणूनच ''विद्यार्थी चळवळ'' हा विषय आज केवळ अभ्यासाचा नाही, तर नव्या भारताच्या घडणीचा मूलभूत विषय आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि माहितीच्या प्रचंड प्रवाहाच्या युगात तरुणांच्या हातात ज्ञानाची साधने आली आहेत; परंतु त्याच वेळी दिशाहीनता, वैचारिक गोंधळ, सामाजिक उदासीनता आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैली यांची आव्हानेही वाढली आहेत. अशा काळात विद्यार्थ्यांनी लोकशाही, संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि राष्ट्रीय बांधिलकी यांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थी चळवळ म्हणजे केवळ आंदोलन नव्हे; ती विवेक, संवाद, जबाबदारी आणि परिवर्तनशील नेतृत्वाची जीवनशाळा आहे.

या व्यापक जाणिवेतून बहिर्जी स्मारक महाविद्यालयाने हा विशेषांक प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. विशेष आनंदाची बाब म्हणजे या अंकाची संकल्पना, लेखसंकलन, संपादन आणि मांडणी या संपूर्ण प्रक्रियेत आपल्या विद्यार्थी संपादक मंडळाने अत्यंत परिश्रमपूर्वक, अभ्यासपूर्ण आणि जबाबदारीने सहभाग नोंदविला आहे. विषयाचा अभ्यास, विविध विचारप्रवाहांचा शोध, संदर्भांचे संकलन आणि गुणवत्तापूर्ण लेखन यांतून त्यांनी आपल्या बौद्धिक क्षमतेचा उत्कृष्ट प्रत्यय दिला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल मी सर्व विद्यार्थी संपादकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. ही केवळ संपादकीय कामगिरी नसून त्यांच्या नेतृत्वगुणांची, संघभावनेची आणि संशोधनवृत्तीची उज्ज्वल साक्ष आहे.

या विशेषांकासाठी मार्गदर्शन करणारे सर्व प्राध्यापक डॉ. आर.बी. कावळे, प्रा. प्रदीप इंगोले, प्रा. अनिल कल्याणकर, लेखन करणारे विद्यार्थी, विविध विभागांचे प्रमुख आणि विशेषतः या अंकाचे प्रमुख डॉ. बी. बी. खंदारे यांनी दाखविलेली अभ्यासपूर्ण दृष्टी, नियोजनशक्ती आणि सातत्यपूर्ण परिश्रम निश्चितच कौतुकास्पद आहेत. त्यांच्या समर्पणामुळे हा अंक केवळ लेखांचा संग्रह न राहता विचारांचे सजीव दस्तावेज बनला आहे.

बहिर्जी स्मारक महाविद्यालय हे केवळ पदवी प्रदान करणारे केंद्र नाही; तर विचारशील, संवेदनशील, संविधाननिष्ठ आणि सामाजिक बांधिलकी जपणारे नागरिक घडविण्याची अखंड साधना करणारी संस्था आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० च्या मूल्यांनुसार विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, संशोधनवृत्ती, नेतृत्व, सामाजिक उत्तरदायित्व आणि सर्जनशीलता विकसित करण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. हा विशेषांक त्या शैक्षणिक ध्येयाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

हा विशेषांक वाचकांच्या मनात प्रश्नांची नवी पालवी फुलवेल, विचारांना नवी दिशा देईल आणि समाजहिताच्या कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करेल, असा मला दृढ विश्वास आहे. कारण इतिहास घडविणारे हात नेहमी तरुणांचेच असतात आणि भविष्य उज्ज्वल करणारे विचारही विद्यार्थ्यांच्या मनातूनच जन्म घेतात.

**– मा. मा. जाधव**
**प्राचार्य**



## संपादकीय...

### विचारांच्या पाऊलखुणा जपत...

प्रत्येक पिढीचा एक आवाज असतो; प्रत्येक काळाचे एक स्पंदन असते. त्या स्पंदनाला दिशा देणारे, प्रश्नांना शब्द देणारे आणि परिवर्तनाला गती देणारे सामर्थ्य जर कोणामध्ये असेल, तर ते विद्यार्थ्यांमध्ये. म्हणूनच विद्यार्थी चळवळ हा केवळ इतिहासाचा विषय नाही; तो वर्तमानाचा आरसा आणि भविष्याचा मार्गदर्शक आहे.

आजच्या वेगवान, डिजिटल आणि स्पर्धात्मक युगात माहिती सहज उपलब्ध आहे; परंतु विचारांची खोली, चिकित्सक दृष्टी, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्यांप्रती असलेली बांधिलकी यांची जोपासना अधिक आवश्यक बनली आहे. विद्यार्थी हा केवळ पदवी मिळविणारा युवक नसून समाजमनाला दिशा देणारा विचारवंत, परिवर्तनाचा वाहक आणि राष्ट्राच्या भवितव्याचा शिल्पकार आहे. या जाणिवेतूनच ''विद्यार्थी चळवळ'' हा विशेषांक साकारण्याचा आमचा प्रयत्न आहे.



या विशेषांकाचा हेतू कोणत्याही एका विचारप्रवाहाचे समर्थन किंवा खंडन करणे हा नसून, भारतातील विविध विद्यार्थी चळवळींचा इतिहास, त्यांची वैचारिक पार्श्वभूमी, सामाजिक योगदान, लोकशाहीतील भूमिका आणि समकालीन संदर्भ यांचा अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ परिचय विद्यार्थ्यांना करून देणे हा आहे. मतभिन्नतेतून संवाद, संवादातून समज आणि समजुतीतून सशक्त समाज घडतो, या विश्वासाने आम्ही हा वैचारिक प्रवास सुरू केला आहे.

या अंकाची निर्मिती आमच्यासाठी केवळ संपादकीय प्रक्रिया नव्हती; ती शिकण्याची, समजून घेण्याची आणि स्वतःला घडविण्याची एक सुंदर जीवनयात्रा होती. संदर्भग्रंथांचा अभ्यास, विविध विचारधारांचा शोध, लेखन, संपादन, भाषिक परिष्कार, मांडणी आणि पुनर्वाचन या प्रत्येक टप्प्यावर आम्हाला नवे अनुभव, नवी आव्हाने आणि नवे शिक्षण मिळाले. या प्रक्रियेत आम्ही केवळ संपादक राहिलो नाही; तर अधिक सजग विद्यार्थी, संवेदनशील नागरिक आणि विचारशील माणूस होण्याचा प्रयत्न केला.

या प्रवासात आम्हाला सातत्याने प्रेरणा देणारे आमचे आदरणीय प्राचार्य, मार्गदर्शक प्राध्यापक, विविध विभागांचे शिक्षक, सर्व लेखक आणि सहकार्य करणारे प्रत्येक विद्यार्थी यांच्याप्रती आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या विश्वासामुळेच आमचे प्रयत्न आकाराला आले आणि हा विशेषांक आपल्या हातात पोहोचू शकला.

आमचा हा विशेषांक अंतिम सत्य मांडणारा दस्तऐवज नाही; उलट तो विचारांना चालना देणारा, प्रश्न विचारण्याचे धैर्य देणारा आणि विधायक संवादाला आमंत्रण देणारा एक नम्र प्रयत्न आहे. या अंकातील प्रत्येक लेख वाचकांना नवे प्रश्न विचारण्यास, विविध दृष्टिकोन समजून घेण्यास आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व नव्याने जाणण्यास प्रेरणा देईल, अशी आम्हाला आशा आहे.

अक्षरांचे सामर्थ्य विचार घडवते, विचार कृती घडवतात आणि कृती इतिहास घडवते. त्या इतिहासाच्या निर्मितीत जागृत, विवेकी आणि मूल्यनिष्ठ विद्यार्थीच सर्वांत मोठी ताकद असतात. हीच श्रद्धा मनात ठेवून आम्ही हा विशेषांक आपल्या हाती सुपूर्द करीत आहोत.

**– विद्यार्थी संपादक मंडळ**




## अंतरंग

### विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती


| | | |
|---|---|---|
| नव्या पिढीचा आवाज : ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशन | साळी अनुश्री संतोष | ११ |
| अखिल भारतीय विद्यार्थी परिषद | लोखंडे वैष्णवी केशव | १३ |
| सामाजिक बदलाचे साधन म्हणून विद्यार्थी चळवळ | वाघमारे महेश मुंजाजी | १५ |
| विद्यार्थी चळवळ | अंजली बाबाराव अडकिने | १७ |
| युवक दल | सुप्रिया तानाजी पुंड | २० |
| दलित पँथर विद्यार्थी आंदोलन | गायत्री कुमार कांबळे | २२ |
| आदिवासी विद्यार्थी संघ | ऋतुजा संतोष कदम | २४ |
| स्वतंत्रता संग्राम के छात्र और आज का छात्र : तुलनात्मक अध्ययन | प्रगती बालाजी टाकणखार | २६ |
| छात्र आंदोलन-शिक्षा प्रणाली में सुधार के लिए छात्रों का आंदोलन | तयबा अहमद शेख | २९ |
| दलित पँथर आंदोलन : भारत की गुमनाम क्रांती का इतिहास | खैरे दैवशाला नरहरी | ३० |
| National Students Union of India | कांबळे मयुरी जगन्नाथ | ३२ |
| अखिल भारतीय विद्यार्थी परिषद | जाधव कांचन बालाजी | ३४ |
| अखिल भारतीय विद्यार्थी परिषद | होळकर वैशाली विश्वनाथ | ३६ |
| अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) | वाघमारे महेश मुंजाजी | ३८ |
| छात्रोंका क्रांती आंदोलन | इंद्रायणी सतिशकुमार सोनी | ४० |
| भारतातील राजकीय आणि सामाजिक चळवळींमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका | सानिया दिलावर खान | ४१ |
| विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढणारी संघटना : स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) | पतंगे श्वेता शंकरराव | ४६ |
| बहुजन स्टूडेंट फ्रंट: शिक्षणातील समावेशकता आणि आरक्षण विषयक चळवळी | ज्ञानेश्वरी पवार | ४९ |

| | | |
|---|---|---|
| ■ दिव्या शिंदे सरकार एक आधुनिक विद्यार्थी चळवळ | संतोष हिरामण खंदारे | ५१ |
| ■ Akhil Bharatiya Vidyarthi Parishad (ABVP) : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद | | ५३ |
| ■ जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (JNU) आणि दिल्ली विद्यापीठ (DU) | प्रगती टाकणखार | ६१ |
| ■ जामिया मिलिया इस्लामिया (Jamia Millia Islamia) मधील विद्यार्थी चळवळी | संकलक - तय्यबा शेख | ६३ |
| ■ Student-led Movements in India | Vedika Gavali | 64 |
| ■ The Guardians of Liberty: Student Movements and the Evolution of Democratic Values | Tidke Shivani Bandurao | 65 |
| ■ The Vanguard of Liberty: Student Movements and Democratic Resilience | Kapse Umesh Kailas | 67 |
| ■ Student Movement: A Social Consciousness | Chavan Akanksha A. | 69 |
| ■ Scholars of Resistance: The Evolution of Student Revolutions in India | Jadhav Abhishek K. | 71 |


## विभाग अहवाल


| | | |
|---|---|---|
| ■ मराठी विभाग | प्रा.डॉ.बी.बी. खंदारे | ७५ |
| ■ हिंदी विभाग | डॉ. सुभाष क्षीरसागर | ७७ |
| ■ Department of English | Dr. Narsingh Pimparne | 79 |
| ■ अर्थशास्त्र विभाग | डॉ. सोनाजी पतंगे | ७९ |
| ■ राज्यशास्त्र विभाग | डॉ. पी. डब्ल्यू. पाटील | ८० |
| ■ समाजशास्त्र विभाग | डॉ. आर.जी. कुमावत | ८१ |
| ■ इतिहास विभाग | प्रा. डॉ. आर. आर. मुटकुळे | ८३ |
| ■ राष्ट्रीय सेवा योजना विभाग | डॉ. श्रीकांत गावंडे, डॉ. स्वाती पाटील | ८३ |
| ■ शारीरिक शिक्षण विभाग | डॉ. नवनाथ एन. लोखंडे | ८४ |
| ■ सांस्कृतिक विभाग | डॉ.एस.एन. क्षीरसागर | ८५ |
| ■ प्रशासकीय विभाग | डॉ. पांडुरंग बर्वे | ८६ |
| ■ Department of Physics | Dr. Anil Kalyankar | 87 |
| ■ Department of Chemistry | Dr. A.S. Kulkarni | 89 |
| ■ Department of Botany | Prof. Dr. V.T. Narwade | 90 |
| ■ Department of Zoology | Dr. S.S. Bhalerao | 91 |
| ■ Department of Mathematics | Dr. R.N. Ingle | 92 |
| ■ Department of Sports | Mr. Niranjan Akmar | 93 |
| ■ Internal Quality Assurance Cell (IQAC) | Dr. Narsingh Pimparne | 97 |
| ■ वाणिज्य विभाग | डॉ. एस.आर. ढेंबरे | ९८ |
| ■ Department of Library | Dr. Savita Awachar | 101 |

''विद्यार्थी चळवळ म्हणजे केवळ आंदोलन नव्हे;
ती विवेक, मूल्ये आणि लोकशाहीची जीवनशाळा आहे.''



# बहिर्जी गीत

मातीची आतून आली, बहिर्जीच्या हाक मनाला
वापटीचा वीर शिंदे, जुलमाच्या धाक मनाला
ही इथली आमुची माती
ही इथली आमुची भाषा
दबलेली गुलाम होती
होती आत कुढत निराशा
हिमतीचे अंकुर दिले, जमीनीच्या खाक मनाला
मातीची आतून आली, बहिर्जीच्या हाक मनाला
ती त्याची वाहती गंगा
जन्माचा किनारा होती
ती त्याची लाट उर्मीची
जन्माचा सहारा होती
तेव्हाही त्याचे होते कर्णाच्या चाक मनाला
मातीची आतून आली, बहिर्जीच्या हाक मनाला
तो लढला तुमच्यासाठी
तो लढला मुक्तीसाठी
नशिबात नव्हत्या त्याच्या
तरी स्वातंत्र्याच्या गाठी
आजही उभारी देई, जनतेच्या लोक मनाला
मातीची आतून आली, बहिर्जीच्या हाक मनाला

**– फ. मुं. शिंदे**

# नव्या पिढीचा आवाज : ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशन

– साळी अनुश्री संतोष
एम.कॉम.

**पार्श्वभूमी :**

भारतातील स्वातंत्र्य चळवळीच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी AISF ची स्थापना झाली. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांविरूद्ध विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याची गरज होती. १९३६ साली All India Students Federation ची स्थापना झाली. या संघटनेच्या स्थापनेत पी.सी.जोशी व सत्यपाल डांग यांसारख्या नेत्यांचा सहभाग होता.

भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थीवर्ग हा समाजातील सर्वात जागरुक आणि क्रांतिकारी घटक मानला जात होता. देशातील राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक बदलांमध्ये विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका होती. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्यात राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे आणि अन्यायकारक धोरणांविरूद्ध एकत्रितपणे आवाज उठवण्यासाठी AISF ची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्रात विद्यार्थी चळवळींना एक समृद्ध आणि लढाऊ परंपरा लाभलेली आहे. शिक्षणातील वाढती फी, वसतिगृहांच्या समस्या, शिष्यवृत्तीतील अडचणी आणि बेरोजगारी यांसारख्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांनी वेळोवेळी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

या पार्श्वभूमीवर AISF ने महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांच्या हक्कांसाठी प्रभावी लढा उभारला आहे. ही आंदोलने केवळ तात्पुरत्या समस्यांपुरती मर्यादित नसून, शिक्षणात समानता, न्याय व सर्वांसाठी संधी निर्माण करण्याच्या व्यापक उद्दिष्टांशी जोडलेली आहेत. त्यामुळे AISF च्या नेतृत्वाखाली झालेली विद्यार्थी आंदोलने महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

AISF च्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विविध आंदोलनाद्वारे विद्यार्थ्यांचे प्रश्न ठळकपणे मांडले गेले. ही आंदोलने केवळ विरोधापुरती मर्यादित नसून शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्नही करतात. त्यामुळे AISF ची चळवळ ही विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि न्याय शिक्षणासाठी लढणारी एक प्रभावी शक्ती म्हणून ओळखली जाते.

**AISF ची उद्दिष्टे :**

विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे AISF चे प्रमुख उद्दिष्ट आहे. शिक्षण सर्वांसाठी सुलभ, परवडणारे आणि समान असावे यासाठी ही संघटना कार्य करते. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे हेही तिचे महत्त्वाचे ध्येय आहे.

तसेच सामाजिक अन्याय, विषमता आणि भेदभावाविरूद्ध आवाज उठवून न्याय समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी AISF प्रयत्न करते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांबाबत

जागरुक करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हेही तिच्या उद्दिष्टांमध्ये समाविष्ट आहे.

**AISF चे कार्य :**

महाराष्ट्रात AISF ने विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सक्रियपणे काम केले आहे. शिक्षणातील वाढती फी, वसतिगृहांच्या समस्या, शिष्यवृत्तीतील अडचणी आणि बेरोजगारी यांसारख्या मुद्यांवर या संघटनेने अनेक आंदोलनांचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी मोर्चे, निवेदने आणि सभांद्वारे सतत प्रयत्न केले जातात.

तसेच, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि राजकीय जागरुकता निर्माण करण्यासाठी चर्चासत्रे, परिषद आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी मिळाव्यात यासाठी AISF विशेष प्रयत्न करते. यामुळे महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढणारी एक प्रभावी संघटना म्हणून AISF ओळखली जाते.

महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये २०१४ ते २०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर अनेक आंदोलने झाली असून त्यामध्ये AISF ने सक्रिय भूमिका बजावली आहे. शिक्षणातील वाढती फी, आरक्षणातील अन्याय, रिक्त पदे न भरणे, शिष्यवृत्तीतील अडचणी आणि शिक्षणाचे खासगीकरण या मुद्यांवर AISF ने सातत्याने संघर्ष केला.

या काळात महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये AISF ने मोर्चे, आंदोलन, निवेदन आणि जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न ठळकपणे मांडले. विशेषतः २०१९ नंतर शिक्षण धोरण, फी वाढ आणि रोजगाराच्या संधी यांसारख्या मुद्यांवर आंदोलने अधिक तीव्र झाली. छत्रपती संभाजीनगर येथे २०२५ मध्ये आरक्षित प्रवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी AISF ने मोठा मोर्चा काढून शासनावर दबाव टाकला होता.

तसेच, २०२६ च्या सुमारास (या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात) राज्यातील सरकारी शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात AISF च्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत शासनाच्या धोरणाला विरोध केला. या सर्व आंदोलनांमधून AISF ने महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत शिक्षणात समानता, पारदर्शकता आणि न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे ही चळवळ विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना दिशा देणारी आणि प्रभावी ठरलेली आहे.

**आंदोलनात मांडलेले प्रश्न :**

१. शिक्षणाशी संबंधित प्रश्न : शिक्षण स्वस्त का नाही? फी वाढ का केली जाते?

२. समानतेशी संबंधित प्रश्न : सर्वांना समान संधी का मिळत नाही? भेदभाव का केला जातो?

३. रोजगाराशी संबंधित प्रश्न : बेरोजगारी कमी करण्यासाठी काय उपाय आहेत? विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी का कमी आहेत?

■

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

– लोखंडे वैष्णवी केशव
बी.ए.प्रथम वर्ष

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) हा भारतातील एक प्रमुख विद्यार्थी संघटना आहे.

**स्थापना आणि संलग्नता :**

स्थापना : ९ जुलै १९४८ रोजी.

संलग्नता : ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) ची विद्यार्थी शाखा आहे. एबीवहीपीचा थेट भारतीय जनता पक्षाशी संबंधी नसला तरी ही पक्षासाठी नेतृत्वाचा एक मोठा स्त्रोत आहे.

सध्याची ताकद आणि अलीकडील यश :

एबीव्हीपी सध्या विस्ताराच्या जोरदार टप्प्यातून जात आहे. संघटनेचा दावा आहे की तिची सदस्य संख्या ७७ लाख पेक्षा जास्त झाली आहे. अलीकडच्या वर्षात एबीव्हीपीने अनेक प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये मोठी यशे मिळविली आहेत.

दिल्ली विद्यापीठ : सप्टेंबर २०२५ च्या निवडणुकीत एबीव्हीपीने अध्यक्ष, सचवि आणि संयुक्त सचिव अशी तीन प्रमुख पदे जिंकली.

हैदराबाद विद्यापीठ : येथे एबीव्हीपीने सर्व सहा पदांवर क्लीन स्वीप केूला, जो वामपंथी गडात ऐतिहासिक विजय मानला जात आहे.

असम विद्यापीठ : नोव्हेंबर २०२५ मध्ये एबीव्हीपीने येथेही सर्व सहा पदे जिंकली.

इतर परिसर : पंजाब विद्यापीठात पहिल्यांदाच अध्यक्षपद आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, अलीगड मुस्लीम विद्यापीठ यासारख्या पारंपारिक, विरोधी गडांमध्येही एबीव्हीपीने नोंदणी करून आपली पकड मजबूत केली आहे.

एबीव्हीपीच्या यशामागे विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याची क्षमता, रास्त मुद्यांवर आंदोलने आणि संघटनात्मक ताकद ही कारणे मानली जातात.

**संघटनात्मक रचना आणि स्वरूप :**

रचना : चार स्तरांवर काम करते, राष्ट्रीय, प्रदेश, शहर आणि महाविद्यालय स्तर.

आरएसएसशी संबंध : एबीव्हीपी ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघची विद्यार्थी शाखा आहे. आणि ती थेट नागपूरला (आरएसएस मुख्यालय) रिपार्ट करते. याचे धोरणात्मक नेतृत्व राष्ट्रीय संघटन सचिव आरएसएसशी समन्वय साधते.

भाजपाशी नाते : एबीव्हीपी ही भाजपची विद्यार्थी शाखा नाही. मात्र ही संघटना भाजपसाठी नेतृत्वाची मोठी नर्सरी मानली जाते. अरूण जेटली यासारखे अनेक नेते एबीव्हीपीमधूनच पुढे आले.

**उद्दिष्टे आणि कार्यपद्धती :**

बोधवाक्य : ज्ञान-शील-एकता (Knowledge-character-unity)

भूमिका : एबीव्हीपीचे म्हणणे आहे की विद्यार्थी हे उद्याचे नागरिक नसून आजचे नागरिक आहेत. त्यामुळे त्यांनी राष्ट्रीय प्रश्नांवर भूमिका घेतली पाहिजे.

**कार्यक्षेत्र :**

राष्ट्रीय मुद्दे : काश्मीरमध्ये तिरंगा लावणे, बांगलादेशी घुसखोरी विरोधात आंदोलन, अनुच्छेद ३७० हटवण्याची मागणी.

शैक्षणिक मुद्दे : व्यापारीकरणाला विरोध, परीक्षा शुल्कवाढ रद्द करण्यासाठी आंदोलने.

सामाजिक उपक्रम : गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद मोफत प्रशिक्षण शिबीरे, समता दिवस – ६ डिसेंबर साजरा करणे.

वाद आणि टीका :

एबीव्हीपीच्या कार्यपद्धतीवर अनेकदा टीका देखील होत असते.

विचारांची असहिष्णुता : जवाहरलाल नेहरू विद्यापीठसारख्या परिसरात डाव्या विचारांच्या विद्यार्थ्यांशी झालेल्या हाणामारी आणि देशद्रोही असा ब्रँड लावल्याबद्दल टीका होते.

हिंदूत्वाचा आग्रह : संघटनेत मुस्लीम सहभाग कमी असल्याचे मान्य करण्यात आले आहे तसेच रावण दहनातून उमर खालीद सारख्या मुस्लीम कार्यकर्त्यांना लक्ष्य केल्याचे आरोप आहेत.

प्रतिस्पर्ध्याशी वाद : अलीकडेच पुण्यात अमित ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनाशी झालेल्या भांडणात एबीव्हीपी कार्यालयावर हल्ला झाला.

■



# सामाजिक बदलाचे साधन म्हणून विद्यार्थी चळवळ

– वाघमारे महेश मुंजाजी
बी.ए.द्वितीय वर्ष

खान सर यांचे नाव फैजल खान आहे. त्यांचा जन्म डिसेंबर १९९३ मध्ये गोरखपूर–उत्तर प्रदेशमध्ये झाला. त्यांचे शिक्षण बी.एस.सी., एम.एस.सी. इलाहाबाद विद्यापीठात झाले. त्यांना शिकवायला आवडते. त्यांचे शिकवण्याचे साधन ऑफलाइन कोचिंग, मोबाईल ॲप आणि युट्यूब (खान जी.एस. रिसर्च सेंटर) त्यांचे स्वप्न होते की एनडीएमध्ये जायचं, पण पेपरमध्ये पाय झाले पण सलेक्शन नाही झाले.

खान सर (फैजल खान) यांनी पाटनामध्ये अगदी अल्प शुल्कात आणि सोप्या भाषेत कठीण विषय शिकवूनही शिक्षणाची क्रांती घडवून आणली. कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून त्यांनी गरीब, गरजू व ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना अधिकारी बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यास मदत केली आहे. ते दरमहा केवळ काही शंभर ते हजार रुपयांमध्ये (उदा. प्रति विषय रु.३०० किंवा पूर्ण कोर्स रु.१४९९) उच्च दर्जाचे शिक्षण देतात.

**खान सरांची शैक्षणिक चळवळ आणि योगदान :**

शिक्षणाचे सुलभीकरण : खान सरांनी जटील विषय (विज्ञान, इतिहास, भूगोल) अतयंत सोप्या सामान्य भाषेत आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणे देवून शिकवण्यास सुरुवात केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांची भीती दूर झाली.

अल्प दरातील कोर्सेस : त्यांच्या खान जी.एस.रिसर्च सेंटरमध्ये फाऊंडेशन कोर्सेस रु.६००० ते १०,००० तर रेल्वे, एसएससी कोर्सेस ३००० ते ५००० च्या अल्प दरात उपलब्ध आहेत.

गरीब विद्यार्थ्यांसाठी आधार : पैशांच्या अभावी विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये हे त्यांचे ध्येय आहे. एसएससी, युपीएससी आणि पीसीएस यासारख्या स्पर्धा परीक्षांचे क्लासेस सुरू केले.

डिजीटल शिक्षण : युट्युब आणि ॲपच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवले. यामुळेच अनेक विद्यार्थी रेल्वे, सैन्य आणि इतर सरकारी पदांवर अधिकारी बनले आहेत.

**अलप दरातील कोचिंग आणि यशाचा आलेख :**

खान सरांच्या ऑनलाईन व ऑफलाईन क्लासेसची बाजारातील इतर क्लासेसच्या तुलनेत खूप कमी आहे. लाखो विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली यश मिळवून पोलीस, रेलवे आणि सरकारी अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.

खान सरांनी शिक्षणाचे बाजारीपण मोडून काढत शिक्षणावर सर्वांचा अधिकार आहे, हे तत्व कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून सिद्ध केले आहे.

कोविड काळ : लॉकडाऊन दरम्यान त्यांनी युट्युबच्या माध्यमातून मोफत शिक्षण देवूनही विद्यार्थ्यांची मदत केली होती. कोविड–१९ च्या काळात जेव्हा सर्व शैक्षणिक संस्था बंद होत्या, तेव्हा खान सरांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होवू दिले नाही.

युट्युब क्रांती : या चॅनेलवर सक्रियपणे व्हिडिओ अपलोड करण्यास सुरुवात केली. त्यांनी अत्यंत कठीण वैज्ञानिक आणि भौगोलिक विषय त्यांच्या खास देशी (भोजपुरी मिश्रीत हिंदी) भाषेत समजावून सांगितले.

कोरोना जागरुकता : केवळ स्पर्धा परीक्षेचे विषयच नव्हे तर त्यांनी कोरोना व्हायरस, व्हॅक्सीन लस आणि ऑक्सीजन याबद्दल वैज्ञानिक माहिती सोप्या भाषेत दिली. ज्यामुळे ते देशभर लोकप्रिय झाले.

मनोबल वाढवणे : लॉकडाऊनच्या तणावपूर्ण वातावरणात त्यांनी आपल्या विनोदी शैलीने मुलांचे मनोरंजन करत त्यांचे अभ्यासातील लक्ष विचलीत होवू दिले नाही. खान सर नेहमी सांगतात की, त्यांना अशा अधिकाऱ्यांची फौज उभी करायची आहे जे गरिबांची सेवा करतील म्हणूनच त्यांनी अत्यंत कमी फीमध्ये हे कोर्सेस उपलब्ध करून दिले आहेत.

खान सरांची अनेक वाक्ये आणि विचार विद्यार्थ्यांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत.

मेहनत आणि इतिहास : जो पाण्याने अंघोळ करेल तो फक्त कपडे बदलेल, पण जो घामाने आंघोळ करेल तो इतिहास बदलेल.

नशिबापेक्षा मेहनतीवर विश्वास : नशीब हे लिफ्टसारखे असते, जे कधीही दगा देवू शकते, पण मेहनत ही पायऱ्यासारखी असते, जी नेहमी तुम्हाला वर घेवून जाते आणि ध्येयापर्यंत पोहोचवते.

पुस्तकावरील प्रेम : जर तुम्हाला मनापासून प्रेम करायचे असेल तर ते पुस्तकांशी करा, जरी ती बेवफा निघाली तरी तुमचे भविष्य नक्कीच घडवून जातील.

अहंकारावर प्रहार : छताला खूप गर्व होतो स्वतःच्या उंचीचा पण वर एक मजला अजून बांधला गेला आणि छत फरशी बनली. अहंकारात माणसाला माणूस दिसत नाही.

अपयशावर मात : यश एका रात्रीत मिळत नाही, त्यासाठी कठोर मेहनत आणि सातत्य हवे. जोपर्यंत आपण यशस्वी होत नाही तोपर्यंत हार मानू नका.

वेळेचे महत्त्व : तुम्ही स्वतःवर वेळ खर्च करा. (स्वतःला घडवा) जेणेकरून भविष्यात लोक तुम्हाला गुगलवर सर्च करतील.

शिक्षण आणि दृष्टिकोन : शिक्षण हे अन्यायाला मुळापासून उपटून टाकण्याचे सर्वात मोठे शस्त्र आहे.

प्रयत्नांची जिद्द : खिशात गांधी असो वा नसो, पण मनात एक वादळ नक्कीच असायला हवे, जेणेकरून तुम्ही ठरवलेले ध्येय पूर्ण करू शकाल.

■

# विद्यार्थी चळवळ

– अंजली बाबाराव अडकिने
बी.एस्सी. द्वितीय वर्ष

प्रस्तावना : विद्यार्थी चळवळ म्हणजे विद्यार्थ्यांनी समाज, शिक्षण व्यवस्था किंवा राजकारणातील प्रश्नांवर एकत्र येवून केलेली संघटीत कृती. विद्यार्थी हे देशाचे भविष्य मानले जाते. समाजात होणाऱ्या बदलामुळे विद्यार्थ्यांचा मोठा वाटा असतो. विद्यार्थ्यांचा आपल्या हक्कासाठी शिक्षणातील समस्यांसाठी आणि सामाजिक प्रश्नांसाठी एकत्र येवून केलेली संघटीत कृती होय. विद्यार्थी चळवळ होय. विद्यार्थी चळवळ म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कासाठी शिक्षणातील सुधारणा आणि समाजातील अन्यायाविरूद्ध केलेली संघटीत लढा होय. विद्यार्थ्यांमध्ये उर्जा, उत्साह आणि बदल घडवण्याची ताकद समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

विद्यार्थी चळवळ शिक्षणाचे गुण वाढवणे की कमी करणे विद्यार्थ्यांनी नेहमी शांततामय आणि योग्य मार्गाने आपल्या मागण्या मांडल्या पाहिजेत. शिक्षित आणि जागरुकता विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी पाया शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी हे उपयुक्त ठरते. त्यामुळे जाणीव विद्यार्थ्यांमध्ये नेमत्व गुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव वाढते. ते देशाचे जबाबदार नागरिक बनतात. हे भारतातील एक प्रसिद्ध विद्यार्थी नेते आहेत. त्यांनी विद्यार्थी चळवळीत होते. महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बिहारमधील साध्या कुटूंबातून घेवून त्यांनी जवाहरलाल नेहरू युनिवरसिटी येथे शिक्षण घेतले.

विद्यार्थी राजकारणात सक्रीय झाले. २०१५ साली ते जेएनयु विद्यार्थी संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आणले. या काळात त्यांनी विद्यार्थ्यांचे हक्क शिक्षणातील स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यासाठी आवाज उठवला.

कन्हैया कुमार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी चळवळ अधिक प्रभावी बनली. त्यांच्या भाषणामुळे अनेक तरूण प्रेरीत झाले. त्यांनी शांततामय पद्धतीने आपले विचार मांडले आणि लोकशाही मार्गाने लढा दिला. कन्हैया कुमार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी चळवळ अधिक प्रभावी बनली. त्यांच्या भाषणामुळे अनेक तरूण प्रेरीत णाले. त्यांनी शांततामय पद्धतीने आपले विचार मांडले आणि लोकशाही मार्गाने लढा दिला.

कारण विद्यार्थ्यांच्या हातात उद्याचे भविष्य आहे. त्यांच्या विचारातूनच नवा समाज घडणार आहे. चळवळ ही केवळ आंदोलन नसते. ती बदलाची सुरुवात असते. नवा इतिहास लिहिणारी असते.

विद्यार्थी चळवळ ही केवळ आंदोलनापुरती मर्यादित नसून तो विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठीही उपयुक्त ठरते. यामुळे विद्यार्थी चळवळ ही नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव वाढते. ते देशाचे जबाबदार नागरिक बनतात.

शेवटी, विद्यार्थी चळवळ ही देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे. विद्यार्थी नेहमी शांततामय आणि योग्य मार्गाने आपल्या मागण्या मांडल्या पाहिजेत. शिक्षण आणि जागरुक विद्यार्थीच

उज्वल भविष्यासाठी पाया घालू शकतात.

विद्यार्थी चळवळीत त्यांनी मांडलेले काही प्रमुख मुद्दे असे होते :

शिक्षण सर्वांगीण : कन्हैया कुमार यांनी उच्च शिक्षण सर्वसामान्यांना परवडेल असे असावे यासाठी आवाज उठवला की वाढीविरोधात त्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य : जेव्ही प्रकरणात त्यांनी विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याचा अधिकार असावा यावर जोर दिला. विद्यापीठ ही विचारांची देवाणघेवाण करण्याची जागा आहे असे ते म्हणाले.

सामाजिक न्याय : दलित आदिवासी आणि सर्वांगीण विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी त्यांनी भूमिका आणि आरक्षण भूमिका समान संधी यांचे संदर्भ त्यांनी केले.

राष्ट्रवादाची नवी व्याख्या : त्यांनी राष्ट्रवादाचा अर्थ सरकारला पाठिंबा देणे नसून देशातील सर्व हक्कासाठी उभे राहणे असा मांडला.

राजकीय जागरुकता : विद्यार्थ्यांनी राजकारणात सक्रिय भूमिका घ्यावी कारण तेच देशाचे भविष्य आहेत असे त्यांनी सांगितले.

त्यांनी सर्वप्रथम शिक्षण, सर्वांसाठी स्वस्थ आणि सुलभ असावे यावर भर दिला. वाढत्या विरोधात त्यांनी आंदोलनात केले. दुसरे म्हणजे त्यांनी विद्यार्थ्यांनी अभिव्यकती स्वातंत्र्याचे समर्थन केले. विद्यापीठ ही विचार मांडण्याची मोकळी जागा असावी असे त्यांचे मत होते.

प्रमुख भूमिका : विद्यार्थ्यांचे हक्क अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शिक्षणातील समानता यासाठी आवाज उठवला.

विचार आणि चळवळ : त्यांची संभाषणशैली प्रभावी असल्यामुळे विद्यार्थी चळवळीत तो एक महत्त्वाचा चेहरा बनला.

सारांश : कन्हैयाकुमार हा जेएनयुमधील विद्यार्थी चळवळीत एक प्रमुख नेता होता. ज्यांना विद्यार्थी चळवळीचा एक लोकशाही भूमिका होती. भारतातील स्वातंत्र्यलढ्यात विद्यार्थी संक्रिया सहभाग घेता. असहकार चळवळ आणि भारत आंदोलन यासारख्या चळवळीमध्ये विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिक्षणाला बहिष्कार केला. निदर्शन केले आणि स्वातंत्र्य मिळण्यासाठी मोठा वाटा उचलला, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि सामाजिक जाणीव निर्माण झाली.

राष्ट्रातही विद्यार्थ्यांच्या चळवळीचा प्रभाव दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन तसेच विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य राजासाठी लढा दिला. आणि नामांतर आंदोलन विरोधी शुल्क वाढ आंदोलनात सहभाग घेतला. एकूणच विद्यार्थी चळवळी या समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे नागरिक आणि नेते असल्यामुळे त्यांची जागरुकता आणि सहभाग देशाच्या उज्वल भविष्यासाठी उज्वल ठरते.

'स्वप्न मोठे पण पाया जमिनीवर
विद्यार्थी चालतात ध्येयाच्या दिशेवर
मेहनत आणि विश्वास सोबत
यश त्यांच्या पावलाशी नक्कीच भेटतं'

विद्यार्थी चळवळीमध्ये विद्यार्थी त्यांच्या हक्कासाठी शिक्षणातील सुधारणा सामाजिक न्याय आणि राजकीय बदल यासाठी उभारलेल्या संघटीत हालचाल होय.

१. शिक्षण शुल्कवाढ विरोधी चळवळ :

ही चळवळ शिक्षण शुल्क वाढीच्या विरोधात केली जाते. विद्यार्थी शिक्षण सर्वांगीण

परवडणारे रहावे यासाठी आंदोलन करतात. यामुळे गरीब व मध्यमवर्गीय न्याय मिळते.

अभ्यासक्रम बदल चळवळ : विद्यार्थी अभ्यासक्रम आधुनिक आणि उपयुक्त रहावा म्हणून ही चळवळ करतात. जुनाट विषयाऐवजी नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याचा समावेश करण्याची मागणी केधली जाते.

डिजिटल शिक्षण सुधारणा चळवळ : ऑनलाइन शिक्षण अधिक प्रभावी व्हावे यासाठी विद्यार्थी इंटरनेट साधने आणि तांत्रिक सुविधा सुधारण्याची मागणी करतात.

रोजगार व बेरोजगारी विरोधी चळवळ : शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगार मिळावा यासाठी विद्यार्थी आंदोलन करतात. सरकारने नोकरीच्या संधी वाढाव्यात अशी मागणी केली जाते.

जेएनयु विद्यार्थी आंदोलन : अलीकडील काळात शुल्कवाढ, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी ही चळवळ झाली. यात अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होतात.

महिला सुरक्षितता चळवळ : महिला विद्यार्थिनींचे सुरक्षेसाठी ही चळवळ केली जाते. कॉलेज परिसर सुरक्षित व्हावा यासाठी विविध उपाययोजना मागितल्या जातात.

दलित पँथर चळवळ : या चळवळीत अनेक तरूण आणि विद्यार्थी सहभागी झाले. समाजातील अन्याय, भेदभाव आणि अत्याचारविरोधात आवाज उठवण्यात विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सामाजिक न्याय चळवळ : समाजातील चळवळ भेदभाव आणि असमानता दूर करण्यासाठी विद्यार्थी एकत्र येतात. समानता आणि बंधुता वाढवणे हा या चळवळीचा उद्देश असतो.

विद्यार्थी हक्क चळवळ : विद्यार्थ्यांचे मुलभूत हक्क जसे की चांगले शिक्षण, सुविधा आणि न्याय मिळावा यासाठी ही चळवळ असते.

असहकार चळवळ : ही चळवळ महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिक्षण संस्थांचा बहिष्कार करून स्वदेशी शिक्षणाला प्रोत्साहन दिले. या चळवळीमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्याची जाणीव झाली. या चळवळीमुळे विद्यार्थ्यांमुळे स्वातंत्र्याची जाणीव आणि देशभक्ती वाढली. विद्यार्थी चळवळीचे महत्व खूप मोठे आहे. या चळवळीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण संघटन शक्ती, सामाजिक जबाबदारी आणि अन्यायाविरोधात लढण्याची ताकद विकसित होते. तसेच या चळवळी समाजातील बदलांना गती देतात आणि लोकशाही मजबूत करतात.

स्वातंत्र्यानंतरही विद्यार्थी चळवळी थांबल्या नाहीत. आंदोलन या चळवळीत विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला. तसेच मंडल आयोग आंदोलनामध्ये आरक्षणाच्या मुद्यावर देशभर विद्यार्थी रस्त्यावर उतरले. या चळवळींनी सरकारच्या धोरणावर मोठा प्रभाव टाकला.

'ना स्वार्थ, ना भीती मनात असते, फक्त न्याय मिळण्याची आस असते,

शांततेचा मार्ग धरून जे पुढे जातात, त्यांच्याच हातून नवी दिशा निर्माण होते...'

■

# युवक दल

– सुप्रिया तानाजी पुंड
बी.ए.प्रथम वर्ष

भारत एक ऐसा देश है जहा युवाओं की संख्या सबसे अधिक है. युवा किसी भी राष्ट्र की बडी शक्ती होते है. उनके भीतर असीम उर्जा, नई सोच, साहस और परिवर्तन की क्षमता होती है. जब यही युवा अपनी शक्ती को केवल अपने स्वार्थ तक सीमीत न रखकर समाजसेवा के लिए समर्पित करते है, तब सीमित न रखकर तब समाज में वास्तविक बदलाव संभव होता है. युवक दल इसी विचार का सजीव रुप है. युवक दल केवल एक संगठन नही, बल्की सेवा, समर्पण और सामाजिक जिम्मेदारी की भावना से प्रेरित एक आंदोलन है.

युवक दल का मुल उद्देश युवाओं को संगठीत करना और उन्हे समाज के प्रती उत्तरदायी बनाना है. आज के युग में युवा अनेक दिशाओं में भटक सकता है, लेकिन युवक दल उसे सही मार्ग दिखाने का कार्य करता है. सेवा के माध्यम से युवा न केवल समाज की सहायता करता है, बल्कि स्वयं के वयक्तित्व का भी निर्माण करता है. युवक दल यह सिखाता है कि सच्ची सफलता वही है, जो समाज के कल्याण से जुडी हो, आज हमारा समाज अनेक समस्याओं से जूंझ रहा है. गरीबी, बेरोजगारी, अशिक्षा, स्वास्थ्य सेवा के क्षेत्र में युवक दल का योगदान अत्यंत सराहनीय है. रक्तदान शिविरो के माध्यम से अनगिनत जीवन बचाने का कार्य किया जाता है. स्वच्छ जांच शिविरो के द्वारा ग्रामीण और पिछडे क्षेत्रो के लोगो को आवश्यक चिकित्सा सुविधाएँ उपलब्ध के प्रती जागरुकता बढती है और लोगो का जीवन स्तर सुधारता है.

स्वच्छता और पर्यावरण संरक्षण भी युवक दल की सेवा यात्रा का महत्त्वपूर्ण हिस्सा है. स्वच्छता अभियानो के लिए प्रेरित किया जाता है. वृक्षारोपण, जलसंवर्धन और पर्यावरण जागरुकता कार्यक्रमो के द्वारा प्रकृती के प्रति जिम्मेदारी की भावना विकसित की जाती है. युवक दल यह संदेश देता है की पर्यावरण की रक्षा करना केवल सरकार का नही बल्की प्रत्येक नागरिक का कर्तव्य है.

शिक्षा के क्षेत्र में युवक दल समाज की मजबूत नींव रखता है. शिक्षा ही वह माध्यम है जो व्यक्ती और समाज दोनो का उत्थान करती है, युवक दल गरीब और जरुरतमंद विद्यार्थियों को शैक्षणिक सहायता प्रधान करता है, मार्गदर्शन शिविर आयोजित करता है और शिक्षा के महत्त्व के प्रति जागरुकता फैलाता है. शिक्षित युवा ही सशक्त राष्ट्र का निर्माण कर सकता है, इस विश्वास के साथ युवक दल निरंतर प्रयासरत रहता है.

आपदा के समय युवक दल की भूमिका विशेष रूखप से उल्लेखनीय होती है. बाढ, सुखा, महामारी या किसी अन्य संकेत के समय युवक दल के स्वयंसेवक बिना किसी भेदभाव के पीडीतो की सहायता के लिए आगे आते है. भोजन, वस्त्र, दवाइँया और आवश्यक सामग्री पहूंचाकर वे मानवता का सच्चा उदाहरण प्रस्तुत करते है. ऐसे समय में

युवक दल समाज के लिए आशा और विश्वास का प्रतीक बन जाता है. युवक दल केवल सेवा कार्य तक सीमीत नही है, बल्कि समाज में जागरुकता फैलाने का भी कार्य करता है. अंधश्रद्धा, नशाखोर और सामाजिक कुरितीयो के सकारात्मक सोच, नैतिक आचरण और अनुशासन की ओर प्रेरित किया जाता है. इससे समाज में स्वस्थ और प्रगतीशील विचारधारा का विकास होता है.

सेवा के माध्यम से युवक दल दुवाओ के व्यक्तित्व का सर्वांगीण विकास करता है. सेवा कार्य करते हुए युवाओं में करुणा, संवेदनशीलता, नेतृत्व क्षमता, आत्मविश्वास और सहयोग की भावना विकसित होती है. ये गुण उन्हे एक जिम्मेदार नागरिक बनाते है. युवक दल युवाओ को केवल समाज के लिए कार्य करना ही नही सिखाता, बल्कि उन्हे एक अच्छा इंसान बनने की प्रेरणा भी देता है.

राष्ट्र निर्माण की प्रक्रिया में युवक दल की भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण है. सेवाभाव से कार्य करने वाला युवा ही सच्चा देशभक्त होता है. युवक दल युवाओं में देशप्रेम, राष्ट्रीय एकता और सामाजिक समरसता की भावना को मजबूत करता है. सेवा के माध्यम से ही सच्ची राष्ट्रभक्ति प्रकट होती है.

आज के भौतिकवादी युग में जहाँ स्वार्थ को अधिक महत्त्व दिया जाता है, वहाँ युवक दल निःस्वार्थ सेवा का संदेश देता है. यह संगठन युवाओं को यह सिखाता है की समाज के लिए किया गया कार्य ही जीवन को सार्थक बनाता है. युवक दल का हर सेवाकार्य समाज में सकारात्मक परिवर्तन की नीव रखता है.

वार्षिक अंक २०२६ का यह सेवा विशेष युवक दल की उसी सेवा यात्रा का दस्ताऐवज है. यह हमे याद दिलाता है की सेवा कोई एक दिन का कार्य नही बल्कि जीवन भर निभाया जाने वाला कर्तव्य है. युवक दल इस कर्तव्य को पुरी निष्ठा और समर्पण के साथ निभा रहा है.

■



# दलित पँथर विद्यार्थी आंदोलन

– गायत्री कुमार कांबळे
बी.ए.प्रथम वर्ष

दलित पँथर विद्यार्थी आंदोलन भारतीय समाज में सामाजिक, न्याय, समानता और मानव गरिमा के लिए चल रहे संघर्ष का एक सशक्त स्वर है. भारत की सामाजिक संरचना लंबे समय से जाति व्यवस्था से प्रभावित रही है, जिसमें दलित और वंचित वर्गो को शिक्षा, अवसर और सम्मान से वंचित रखा गया. ऐसी स्थिती में डॉ.बाबासाहेब आंबेडकर के विचारों से प्रेरित आंदोलन इसी चेतना का परिणाम था, जिसने आगे शोषित समाज को जागरुक किया. दलित पँथर आंदोलन इसी चेतना का परिणाम था, जिसने आगे चलकर छात्र समुदाय को भी संगठीत होने की दिशा दी. वर्ष २०२५-२६ में दलित पँथर से प्रेरित विद्यार्थी आंदोलन ने शिक्षा और समाज दोनों स्तरों पर महत्त्वपूर्ण भूमिका निभाई.

दलित पँथर आंदोलन की शुरुवात १९७० के दशक में महाराष्ट्र से हुई थी. यह आंदोलन केवल विरोध तक सीमित नही था, बल्कि अन्यायपूर्ण सामाजिक व्यवस्था को चुनौती देने वाला एक वैचारिक संघर्ष था. इसका मुख्य उद्देश दलित समाज को आत्मसम्मान दिलाना और सामाजिक समानता स्थापित करना था. समय के साथ साथ इन विचारों का प्रभाव महाविद्यालयों और विश्वविद्यालयों तक पहूंचा. विद्यार्थियों ने यह समझा की शिक्षा केवल डिग्री प्राप्त करने का माध्यम नही है, बल्कि सामाजिक परिवर्तन का सबसे प्रभावी साधन है. इसी सोच ने दलित पँथर विद्यार्थी आंदोलन को नई उर्जा दी. वर्ष २०२५ के दौरान देश की उच्च शिक्षा व्यवस्था में कई गंभीर समस्याएँ सामने आई. प्रवेश प्रक्रिया में असमानता, छात्रवृत्ति में देरी, आवासीष्य सुविधाओं की कमी, शैक्षणिक वातावरण में भेदभाव और मानसिक उत्पीडन जैसे मुद्दे विद्यार्थियों के सामने आए. विशेष रुप से दलित और वंचित वर्ग के विद्यार्थियों को अब भी असमान व्यवहार का सामना करना पडा. ऐसे वातावरण में दलित पँथर विद्यार्थी आंदोलन ने इन समस्याओं को सामने लाने का कार्य किया और न्यायपूर्ण शिक्षा व्यवस्था की मांग को मजबुती से उठाया.

इस अवधि में विद्यार्थी आंदोलन ने संविधानिक मूल्यों को केंछ्द्र में रखा. समानता, स्वतंत्रता, बंधुत्व और सामाजिक न्याय जैसे सिद्धांतो के आधार बनाकर विद्यार्थियों ने अपने अधिकारों की मांग की. आंदोलन शांतिपूर्ण रहा और संवाद, चर्चा से मिनार, रैली तथा जनजागरुकता कार्यक्रमों के माध्यम से आगे बढा. इसका उद्देश केवल प्रशासन पर दबाव बनाना नही था, बल्कि पूरे शैक्षणिक समाज को संवेदनशील बनाना भी था. अनेक स्थानो पर अन्य सामाजिक और छात्र संगठनो ने भी इस आंदोलन को समर्थन दिया. दलित पँथर विद्यार्थी आंदोलन का एक महत्त्वपूर्ण पहलू आत्मसम्मान और पहचान की चेतना रहा. वर्ष २०२५-२६ में विद्यार्थियों के बीच अपने इतिहास, साहित्य और संघषो को जानने की रूचि बढी. दलित साहित्य,

बाबासाहेब आंबेडकर के विचार और सामाजिक न्याय की अवधारणा पर आधारित अध्ययन और चर्चा ने विद्यार्थियों को वैचारिक रूप से सशक्त बनाया. इससे विद्यार्थियों में अन्याय के खिलाफ बोलने का साहस और सामाजिक जिम्मेदारी की भावना विकसित हुई.

हालांकि इस आंदोलन को कई चुनौतियों का सामना भी करना पडा. कुछ शैक्षणिक संस्थानों में प्रशासनिक उदासिनता देखने को मिली, तो कही आंदोलन को गलत दृष्टि से देखा गया. इसके बावजूद विद्यार्थियों ने धैर्य और अनुशासन बनाए रखा. उन्होनें संवैधानिक मार्ग से अपनी मांगे रखी और यह सिद्ध किया की लोकतंत्र में विरोध भी एक जिम्मेदार नागरिक कर्तव्य है. डिजीटल मीडिया और सामाजिक मंचो के माध्यम से आंदोलन की आवाज व्यापक स्तर तक पहूंची, जिससे देश के विभिन्न हिस्सो के विद्यार्थी आपस में जुडे.

के दौरान दलित पँथर विद्यार्थी आंदोलन ने यह स्पष्ट कर दिया की युवा शक्ति समाज परिवर्तन की सबसे बडी ताकत है. जब विद्यार्थी अन्याय और असमानता के विरूद्ध संगठीत होकर खडे होते है तब समाज में सकारात्मक परिवर्तन की संभावना बढ जाती है. इस आंदोलन ने शिक्षा संस्थानों को यह संदेश दिया की युवा शक्ति समाज परिवतृन की सबसे बडी ताकत है. जब विद्यार्थी अन्याय और असमानता के विरूद्ध संगठीत होकर खडे होते है तब समाज में सकारात्मक परिवर्तन की संभावना बढ जाती है. इस आंदोलन ने शिक्षा संस्थानों को यह संदेश दिया कि समान और सुरक्षित शैक्षणिक वातावरण केवल नीति से नही बल्कि सामाजिक चेतना से बनता है. अंततः यह कहा जा सकता है कि दलित पँथर विद्यार्थी आंदोलन २०२५-२६ सामाजिक जागरुकता वैचारिक दृढता और संविधानिक मूल्यों के प्रति निष्ठा का प्रतीक रहा. इस आंदोलन ने यह सिद्ध किया की शिक्षा सामाजिक मुक्ति का माध्यम है और विद्यार्थी समाज के भविष्य निर्माता है. समतामूलक, न्यायपूर्ण और मानवीय समाज के निर्माण की दिशा में यह आंदोलन एक महत्त्वपूर्ण कदम साबित हुआ है.

■



# आदिवासी विद्यार्थी संघ

**– ऋतुजा संतोष कदम**
बी.ए.प्रथम वर्ष

आदिवासी विद्यार्थी संघ यह एक महत्त्वपूर्ण संघ है. जो आदिवासी छात्रों को उनके शिक्षा में सहायता प्रदान करता है, और बहुत से कार्य में सहायता करता है, जैसे की संस्कृति और सामाजिक न्याय के क्षेत्र में सहायता करना, इस आदिवासी विद्यार्थी संघ का मुख्य हेतू यह है की आदिवासी छात्रो को उच्च शिक्षा के अवसरो में समानता प्रदान करना है और उनकी सामाजिक-आर्थिक स्थिती में सुधार लाना है. आदिवासी समुदाय के छात्र अक्सर आर्थिक और सामाजिक चुनौतियो का सामना करना पडता है, जिससे उन्हे शिक्षा प्राप्त करने में कठिनाईयां होती है. आदिवासी विद्यार्थी संघ हमेशा आदिवासी विद्यार्थी को शैक्षणिक मार्गदर्शन और सांस्कृतिक संरक्षण प्रदान करके उनकी मदत करता है. सांस्कृतिक कार्यक्रमो और कार्यशालाओं के माध्यम से आदिवासी संस्कृति का संरक्षण करना. यह संघ आदिवासी छात्रो के लिए करिअर गाईडंस और प्लेसमेंट सपोर्ट प्रदान करता है. आदिवासी विद्यार्थी संघ हमेशा आदिवासी समुदाय के अधिकारो के लिए आवाज उठाता है. यह संघ आदिवासी छात्रो की हर जरुरत पूरी करता है, आदिवासी विद्यार्थी संघ खास आदिवासी छात्रो के लिए बनाया गया है.

आदिवासी संघ, एकता का स्वर, शिक्षा के पथ पर, ज्ञान का दीप जलता

आदिवासी गौरव, भारत का अभिमान....

आदिवासी विद्यार्थी संघ आदिवासी समुदाय के विकास का एक महत्त्वपूर्ण भूमिका निभा रहा है. हमे इस संघ के कार्य पर गुरुर होना चाहिए और आदिवासी छात्रो को उच्च शिक्षा के अवसर प्रदान करने में मदद करनी चाहिए. आदिवासी विद्यार्थी संघ को अपने कार्य को और भी विस्तारीत करना चाहिए और इसे विस्तारीत करने के लिए अधिक संसाधनो की आवश्यकता है. हमे इस संघ के साथ जुडकर आदिवासी समुदाय के विकास में योगदान देना चाहिए. आदिवासी विद्यार्थी संघ ने पिछले कुछ वर्ष में कई महत्त्वपूर्ण सफलता हासील की है. आदिवासी संस्कृती का संरक्षण और प्रचार प्रसार करना, आदिवासी समुदाय के विकास के लिए सामाजिक और आर्थिक योजनाए चलाना. आदिवासी छात्रो को उचित शिक्षा के लिए मार्गदर्शन प्रेरित करना.

जंगल की संपदा, नदियों का सौंदर्य,
आदिवासी संस्कृती, भारत का वैभव,
आदिवासी आवाज, देश के कल्याण के लिए...

आदिवासी छात्रों को आत्मविश्वास और सामर्थ्य प्रदान करना. हमे इस संघ के साथ जूडकर आदिवासी समुदाय के विकास में योगदान देना चाहिए. सफलता की कहानियों को साझा करना और छात्रो को प्रेरित करना. शैक्षणिक असमानता को दूर करना. आदिवासी छात्रो में शिक्षा का प्रसार और सुरक्षित छात्रवास के लिए संघर्ष करना. यह

आदिवासी संघ आदिवासीयों के लिए आदिवासी भाषाओं, परंपराओ और ज्ञान का संरक्षण करती है. यह संघ मुख्य रुप से अनुसूचित जनजाति के छात्रो के मुद्दो पर केंद्रीत है. यह संघ शिक्षा की गुणवत्ता और रोजगार के अवसरो को बढावा देने के लिए संघर्ष करता है. यह संस्था राज्यस्तर पर आदिवासी छात्रो की समस्याओं को उठाने और उनके हक की लढाई लडने का काम करती है. छात्रो के नेतृत्व करना जैसे की उनके गुण विकसित करना और उन्हे सामाजिक मुद्दे के प्रति जागरुक करता. आदिवासी विद्यार्थी संघ सबसे बडा संघ है.

■



# स्वतंत्रता संग्राम के छात्र और आज का छात्र : तुलनात्मक अध्ययन

– **प्रगती बालाजी टाकणखार** बी.एस्सी. प्रथम वर्ष

भूमिका : विद्यार्थी आंदोलन क्या है? 'जब छात्र अपने अधिकार, समाज या देश के लिए संगठित होकर कार्य करते है तब वह विद्यार्थी आंदोलन कहलाता है.' एक संगठित प्रयास जिसमें छात्र समाज, शिक्षा, राजनीति या राष्ट्र से जुडे मुद्दो पर आवाज उठाते है. असल में यह विरोध नही बल्कि जागरुकता, परिवर्तन और नेतृत्व की प्रक्रिया है.

भारत एक युवाओं का देश है. यहाँ के युवा, छात्र सामाजिक न्याय और राष्ट्र के लिए जागरुक है. यह छात्र अन्याय के खिलाफ आवाज उठाना जानते है. स्वातंत्र्यपूर्व काल से लेकर आज तक समाज को दिशा देने में छात्रो का महत्त्वपूर्ण कार्य रहा है. स्वतंत्रता संग्राम में भी छात्रो की भूमिका महत्त्वपूर्ण थी. समय के साथ विद्यार्थी आंदोलन का स्वरूप बदला है, लेकिन उसकी प्रासंगिकता आज भी उतनी ही महत्त्वपूर्ण है.

**स्वतंत्रतापूर्व काल :**

स्वतंत्रतापूर्व समय छात्रो के लिए और राष्ट्र के लिए सबसे महत्त्वपूर्ण था. उस समय में आंदोलनो में छात्र शक्ति का प्रभाव था.

स्वदेशी आंदोलन : स्वदेशी आंदोलन में 'लाल-बाल-पाल' का नेतृत्व था. छात्रों ने विदेशी वस्तुओं का बहिष्कार किया. यहीं से राष्ट्रीय शिक्षा की शुरुआत हुई थी. यह आंदोलन १९०५ से १९११ तक चला.

असहयोग आंदोलन : आंदोलन में महात्मा गांधी जी का नेतृत्व था. छात्रों ने सरकारी स्कूल-कॉलेज छोडे और देशी शिक्षा संस्थान शुरू किए. छात्रों ने भविष्य का त्याग करके राष्ट्र को चुना. यह आंदोलन १९२० में हुआ.

भारत छोडो आंदोलन : आंदोलन में महात्मा गांधी जी का नेतृत्व था. छात्रों ने भूमिगत कार्य किए. आंदोलन में 'करों या मरो' का नारा लगाया. आंदोलन की वजह से कई छात्र जेल गए. छात्र युवा नही बल्कि 'क्रांतिकारी' बने. यह आंदोलन १९४२ में हुआ. 'उस समय छात्र केवल युवा नहीं, बल्कि स्वतंत्रता सैनिक थे'

इन आंदोलनों में महात्मा गांधी जी ने छात्रों को जोडा, अहिंसात्मक आंदोलन सिखाया. भगतसिंह जैसे युवाओं ने आजाद हिंद फौज में भागीदारी ली. सुभाषचंद्र बोस जी ने युवाओं को संगठित किया. 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दुँगा' कहकर युवाओं का जोश और राष्ट्र के प्रति प्रेम बढाया. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जी ने शिक्षा के माध्यम से जागरुकता बढायी. 'शिक्षित हो, संगठित हो, संघर्ष करो' बोलकर युवाओं को सामाजिक आंदोलन से जोडा. स्वामी विवेकानंद जी ने उठो, जागो और लक्ष्य प्राप्ति तक रुको मत, कहकर युवाओं का आत्मविश्वास बढाया.

इन सभी महान व्यक्तिमत्वों का युवाओं को साथ मिला और आंदोलन सफल रहे. इन सभी के वजह से विद्यार्थियों को जोश, राष्ट्र के प्रति

उनका प्रेम, आत्मविश्वास, जागरुकता, प्रेरणा बढी. अन्याय के खिलाफ आवाज उठाना, जागरुक नागरिक बनाना, नेतृत्व निर्माण करना - यह सब छात्रों ने सिखा.

**स्वतंत्रता के बाद का छात्र :**

स्वतंत्रता के बाद आंदोलन के मुद्दे बदल गए. अब के छात्र स्वयं के अधिकारों के लिए आवाज उठाने लगे. शिक्षा, फीस, आरक्षण, रोजगार यह आंदोलन के मुख्य मुद्दे बन गए, विद्यार्थी लोकतांत्रिक अधिकारों की मांग करने लगे.

गुजरात नवनिर्माण आंदोलन : यह आंदोलन विद्यार्थियों ने किया था. विद्यार्थियों ने खुद इस आंदोलन का नेतृत्व किया था. यह आंदोलन चिमनभाई पटेल के भ्रष्टाचार के खिलाफ था. विद्यार्थियों ने भ्रष्टाचार के खिलाफ आवाज उठाया और उनकी भ्रष्ट सरकार गिरा दी. यह आंदोलन १९७३ से १९७४ तक चला.

बिहार आंदोलन : आंदोलन का नेतृत्व जयप्रकाश नारायण जी ने किया और इस वजह से इसे 'जेपी आंदोलन' के नाम से भी जाना जाता हे. राज्य में व्याप्त कुशासन, भ्रष्टाचार और महंगाई के खिलाफ छात्रो द्वारा शुरू कि;या गया एक प्रमुख राजनीतिक आंदोलन था. जे.पी. जी ने 'संपूर्ण क्रांति' का आव्हान कि;या, जिसने इंदिरा गांधी सरकार को हिलाकर रख दिया. यह आंदोलन १९७४ में हुआ.

मंडल आंदोलन : भारत में अन्य पिछडा वर्ग-ओबीसी के लिए २७ टक्के आरक्षण लागू करने के लिए हुआ. एक महत्त्वपूर्ण सामाजिक-राजनीतिक संघर्ष था. देशभर के छात्र इस आंदोलन में सहभागी थे. यह आंदोलन १९९० में हुआ.

आधुनिक आंदोलन : आधुनिक आंदोलन में फीस वृद्धि का विरोध, पर्यावरण सुरक्षा, महिला सुरक्षा, सोशल मीडिया ॲक्टीविझम जैसे मुद्दे है.

'आज का छात्र अधिकारों के प्रति जागरुक है, लेकिन उसका संघर्ष व्यक्तिगत, सामाजिक मुद्दो तक सीमित हो गया है'

**तुलना :**

जहाँ पहले के छात्र राष्ट्र की स्वतंत्रता और बंधुता को प्रधान्य देते थे, वही आजकल के छात्र व्यक्तिगत और सामाजिक मुद्दो को प्राधान्य देते है. पहले के छात्रों की सोच में राष्ट्र के लिए त्याग और बलिदान था और आजकल के छात्र अधिकार और सुविधाओं के बारे में सोचते है. पहले के छात्र आंदोलन, जेल, बलिदान करके अहिंसात्मक तरिके से लडते थे और आज के छात्र प्रोटेस्ट और सोशल मीडिया जैसे तरीके अपनाते है. पहले के छात्र के मन में राष्ट्रप्रेम का भाव था और आज के छात्र व्यक्तिगत विकास और जागरुकता का भाव रखते है.

'पहले छात्र राष्ट्र के लि,ए जीते थे, आज छात्र स्वयं के लिए संघर्ष करना भी जानते है'

विद्यार्थी आंदोलन का महत्त्व :

विद्यार्थी आंदोलन विद्यार्थियों में नेतृत्व निर्माण बढाता है. विद्यार्थियों में अन्याय के खिलाफ आवाज उठाने के लिए आत्मविश्वास बढता है. लोकतंत्र की रक्षा करने में प्रभावी होता है. समाज में सुधारणा होती है. विद्यार्थियों में संगठित रहने की भावना निर्माण होती है. विद्यार्थी सच्चे अर्थ से जागरुक नागरिक बनता है.

**समस्याएँ और चुनौतियाँ :**

आजकल विद्यार्थी आंदोलन और शिक्षा पद्धती में राजनीति का हस्तक्षेप बढता जा रहा है, जिसकी वजह से विद्यार्थियों का मन परिवर्तन होता हे, विद्यार्थियों में अहिंसा भाव कम होता जा रहा है, दिशा की कमी बढती जा रही है, अहिंसात्मक भाव नष्ट होता जा रहा है और हिंसाभाव बढ रहा है. जिससे कई बार आंदोलन हिंसात्मक हो रहा है. सोशल मीडिया का लोगों को अपमानजनक टिप्पणीयाँ करने के लिए उपयोग हो रहा है जो की गलत है. आंदोलन दिशा खोने लगा है और जब आंदोलन दिशा खो देता है, तो वह परिवर्तन के बजाय अराजकता बन जाता है.

**समाधान :**

आंदोलन के लिए सिर्फ शक्ती ही नहीं, बल्कि जागरुकता और जिम्मेदारी भी होनी चाहिए. सिर्फ शिक्षा ही नहीं, शिक्षा के साथ सामाजिक समझ भी जरुरी है. आंदोलन करते समय हिंसात्मक भाव नहीं होना चाहिए, आंदोलन अहिंसात्मक ही होना चाहिए. एक सफल आंदोलन के लिए सही नेतृत्व की आवश्यकता होती है. 'विद्यार्थी आंदोलन को शक्ति के साथ-साथ दिशा की भी आवश्यकता है'

निष्कर्ष : विद्यार्थी समाज का भविष्य ही नहीं, वर्तमान भी है. यदि छात्र जागरुक, संवेदनशील और जिम्मेदार होंगे, तो राष्ट्र का भविष्य भी उज्वल होगा.

'कल के छात्र स्वतंत्रता सेनानी थे, और आज के छात्र कल का भारत बनाऐंगे'

■



# छात्र आंदोलन
# शिक्षा प्रणाली में सुधार के लिए छात्रों का आंदोलन

– **तयबा अहमद शेख,** बी.कॉम द्वितीय वर्ष

प्रस्तावना : शिक्षा मनुष्य की जीवन का सबसे महत्त्वपूर्ण आधार है. यह केवल ज्ञान प्राप्त करने का माध्यम नही, बल्कि व्यक्ति के सर्वांगीण विकास का साधन भी है. एक मजबूत शिक्षा प्रणाली किसी भी देश की प्रगति और विकास में महत्त्वपूर्ण भूमिका निभाती है. वर्तमान समय में हमारी शिक्षा प्रणाली कई समस्याओं से घिरी हुई है, इसलिए इसमें सुधार करना अत्यंत आवश्यक हो गया है.

वर्तमान शिक्षा प्रणाली की स्थिति :

आज की शिक्षा प्रणाली मुख्य रुप से परीक्षा और अंको पर आधारित है. विद्यार्थियों को विषयो की गहरी गहराई से समझ देने के बजाय उन्हे रटने पर अधिक जोर दिया जाता है. इससे उनकी सोचने और समझने की क्षमता सीमित हो जाती है. इसके अलावा शिक्षा में व्यावहारिक ज्ञान की कमी भी देखने को मिलती है, जिससे विद्यार्थी वास्तविक जीवन की चुनौतियों का सामना करने में असमर्थ रहते है.

ग्रामीण और शहरी क्षेत्रों में शिक्षा की गुणवत्ता में भी काफी अंतर है. शहरो में आधुनिक सुविधाएँ उपलब्ध है, जबकि ग्रामीण क्षेत्रो में अभी भी संसाधनो की कमी होती है.

निष्कर्ष : अंत में कहा जा सकता है कि शिक्षा प्रणाली में सुधार समय की आवश्यकता है. यदि हम इसे आधुनिक, व्यावहारिक और समान बनाएँ तो हम एक उज्ज्वल भविष्य का निर्माण कर सकते है. इसके लिए सरकार शिक्षक, अभिभावक और विद्यार्थियों को मिलकर प्रयास करना होगा. ■



# दलित पँथर आंदोलन : भारत की गुमनाम क्रांती का इतिहास

– **खैरे दैवशाला नरहरी,** बी.ए.प्रथम वर्ष

हम बात करेंगे एक ऐसा आंदोलन जिसने भारत की सामाजिक निम को हिलाकर रख दिया. यह आंदोलन था दलित पँथर आंदोलन १९७० के दशक में महाराष्ट्र से शुरू हुआ. यह आंदोलन सिर्फ दलितो के अधिकारो की लडाई नही थी, बल्कि यह उस व्यवस्था के खिलाफ एक जंग थी. जो सदियो से शोषण व असमानता पर टिकी थी. अमेरिका के ब्लैंक पँथर आंदोलन से प्रेरित यह आंदोलन नारेबाजी कविता और सडको पर उतरकर लडी गई लडाई का अनुठा मिश्रण था.

दलित पँथर आंदोलन कारे समझने के लिए हमे २७७० के दशक के भारत को देखना होग. उस समय भारत के दलित समुदाय की हालत क्या थी. छुआछुत जातिगत भेदभाव और हिंसा दलितो के जीवन का हिस्सा थी. गांव में दलितो को अच्युत समझा जाता था. उनके साथ पाणी के स्त्रोतो मंदिरो में और स्कुलो में भी भेदभाव होता था. दलितो को खेती, मजदुरी, सफाई तक सिमीत किया गया था. उनकी आय इतनी कम थी की वह गरिबी के चक्र से निकल ही नही पाते थे. संविधान में आरक्षण का प्रावधान था. लेकीन जमीन पर इसका असर नही दिख रहा था. दलित नेता राजनीती में तो आ रहे थे, पर सिस्टम को बदलने की ताकद नही थी. ऐसे में दलित युवाओं ने महसूस किया की शांतीपूर्ण आंदोलन अब काम नही करेगा, उन्हे एक आक्रमक आंदोलन की जरुरत थी. यही से दलित पँथर आंदोलन की स्थापना हुई.

स्थापना : १९७० के दशक में (२९ मे १९७२) इसके संस्थापक थे १. नामदेव ढसाळ. मराठी के प्रसिद्ध कवी, जिनकी कविताए दलितो के दर्द और गुस्से को आवाज देती थी. २. राजा ढाले : विचारक और लेखक जिनहोने दलित पँथर का घोषणा पत्र लिखा. ३. जे.वी.पवार : युवाओं को संघटीत करने वाले नेता. यह आंदोलन डॉ.आंबेडकर के विचारो से प्रेरित था. लेकीन इसमें मार्क्सवाद और ब्लैंक पँथर की क्रांतिकारी भावना थी.

यह आंदोलन छात्रों ने शिक्षा में आरक्षण, छात्रवृत्ती, दलित महिलाओं पर अत्याचार और ग्रामीण इलाको में जातिगत भेदभाव के खिलाफ संघर्ष था.

ढाले ने कहा था, 'हमे सिर्फ सत्ता नही चाहिए. हमे व्यवस्था बदलनी है. आंदोलन का नारा था, जय भीम-लाल सलाम. यह आंबेडकरवाद और मार्क्सवाद का मेल था.'

१९७३ में जारी दलित पँथर आंदोलन का घोषणा पत्र में कहा दलितो, आदिवासियों, पिछडो और गरिबो को एकजुट करो, सामंतवाद, पुंजीवाद और ब्राह्मणवाद के खिलाफ लडो, महिलाओ, धार्मिक अल्पसंख्याओ को अधिकारो की रक्षा करो, दलित पँथर ने सिर्फ नारे नही दिए, बल्कि सडको पर उतरकर लडाई लडी.

नाम पुछने से पहले जाति पुछी गई.

काबिलियत से पहले खानदान, हमने हर सवाल का जवाब दिया, पर सवाल पुछने वालो पर कभी सवाल नही उठा...

**कुछ ऐतिहासिक घटनाएँ :**

वर्ली दंगा १७७४ मुंबई के वर्ली इलाके में दलितो और स्थानिक समुदाय के बीच झडक हुई. पँथर नेता धरने पर बैठे, पुलिस ने गोली चलाई, और आंदोलन ने राष्ट्रीय सुर्खियाँ बाटी, मराठा विश्वविद्यालय का नाम बदलो आंदोलन दलित पँथर ने मराठवाडा युनिव्हर्सिटी का नाम डॉ.आंबेडकर विश्वविद्यालय करने की मांग की. इस दौरान हजारो दलित छात्रो ने रैलीया और भूक हडताल में हिस्सा लिया. नामदेव ढसाळ की कविता संग्रह को गोल पिठा ने दलित साहित्य को नई दिशा दी. पँथर ने अकबार साधना और पँथर निकालकर जनता तक अपना संदेश पहूंचाया, सरकारने पँथर नेताओं को आतंकवादी कहकर जेल मे डाल दिया. १९७४ में राजा ढाले को गिरफ्तार किया गया. पर आंदोलन रुका नही. दलित पँथर ने भारतीय समाज को कैसे बदला, दलित युवाओं ने पहली बार महसूस किया की वह वोट बँक नही, बल्कि वह सत्ता के दावेदार है. इस आंदोलन की बदौलत बाद में बहुजन समाज पार्टी जैसे दल उभरे, दलित साहित्य, कविता और नाटको ने मुख्य धारा को निती दी.

ढसाळ की कविता में ब्राह्मणवाद की गर्दन पर चढकर बोलुंगा निसाहित्यिक दुनिया को निचोडकर दिया. पँथर ने महिलाओं को भी आगे किया. उर्मिला पवार जैसे लेखिकाओं ने महिलाओ के शोषण पर लिखा. यह आंदोलन आफ्रिका, अमेरिका के ब्लैक राईडस् मुव्हमेंटस से जुडा. नामदेव ढसाळ ने अमेरिका दौरा किया गया. ब्लैंक पँथर के साथ संवाद किया.

१९८० तक दलित पँथर आंदोलन कमजोर हो गया. इसके पिछे का कारण नामदेव ढसाळ और राजा ढाले के बीच विचार धारात्मक टकराव हुआ. ढसाळ मार्क्सवाद से दूर होकर आंबेडकरवाद की ओर बढे. काँग्रेस और समाजवादी दलोने आंदोलन को अपने हित में इस्तेमाल करना चाहा. मुस्लिम नेता को लगातार प्रतारित किया. और कई कार्यकर्ताओ को जेल में डाल दिया गया. क्या आंदोलन का लक्ष सिर्फ दलितो की लडाई है. या सभी शोषितो की यह सवाल अनुत्तरीत रहा. लेकीन यह आंदोलन मरा नही, बल्कि नये रुप में बदल गया.

स्वतंत्रता दिन पर बहिष्कार १५ ऑगस्ट १९७३ को दलित पँथरने (ब्लैंक इंडिपेंडंस डे) मनाया गया. याने काला स्वातंत्र्य दिन.

इस आंदोलन में सिद्धार्थ कॉलेज, मुंबई के छात्र शामिल थे. दलित पँथर ने न केवल महाराष्ट्र में बल्कि अन्य राज्यों में भी छात्रो के माध्यम से अपनी शाखाए स्थापित की.

आज भी दलित युवा पँथर के नारो को याद करती है. ऐसे में दलित पँथर का इतिहास हमें क्या सिखाता है. पँथर ने दिखाया की दलित, आदिवासी और पिछडे वर्ग एक साथ आये तो व्यवस्था बदल सकते है. कलम और कविता से भी क्रांती की जा सकती है. पँथर युवाओं का आंदोलन था. आज के युवाओ को भी सोशल मीडिया और शिक्षा को हथियार बनाना चाहिए.

■

# National Students Union of India

– कांबळे मयुरी जगन्नाथ
बी.ए.द्वितीय वर्ष

प्रस्तावना : भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. या लोकशाही व्यवस्थेत युवक आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न, त्यांचे हक्क आणि त्यांची सामाजिक जबाबदारी यांचा विचार करून विविध विद्यार्थी संघटना निर्माण झाल्या. त्यापैकी NSUI ही एक प्रभावी आणि व्यापक विद्यार्थी संघटना आहे. ही संघटना Indian National Congress ची शाखा असून देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना एकत्र आणते.

स्थापना व ऐतिहासिक पार्श्वभूमी :

NSUI ची स्थापना : ९ एप्रिल १९७१

१९७० च्या दशकात भारतात राजकीय आणि सामाजिक बदलांचा काळ होता. त्या काळात विद्यार्थ्यांना एक संघटीत व्यासपीठ मिळावे, त्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडता याव्यात आणि युवकांना राष्ट्रनिर्मितीत सहभागी करून घ्यावे, या उद्देशाने NSUI ची स्थापना करण्यात आली.

स्थापनेनंतर NSUI ने हळूहळू देशातील विविध राज्यांमध्ये आपले जाळे निर्माण केले आणि अनेक महत्त्वाच्या विद्यार्थी चळवळीमध्ये सहभाग घेतला.

तत्वज्ञान आणि विचारधारा : NSUI ची विचारधारा प्रामुख्याने लोकशाही धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यावर आधारित आहे.

सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी, शिक्षण हे प्रत्येकाचे मुलभूत अधिकार असावे, जाती, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नको, युवकांनी देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा.

उद्दिष्टे : NSUI ची उद्दिष्टे केवळ शिक्षणापुरती मर्यादित नसून सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रीत करतात.

१. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काचे संरक्षण, २. शिक्षण स्वस्त आणि सर्वांसाठी उपलब्ध करणे, ३. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, ४. सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांवर जागरुकता निर्माण करणे, ५. रोजगार आणि कौशल्य विकासासाठी प्रयत्न करणे. ६. संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे.

संघटनात्मक रचना : NSUI ची रचना अत्यंत मजबूत आणि व्यवस्थिति आहे.

१. राष्ट्रीय स्तर – राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय सचिव, कार्यकारिणी सदस्य.

२. राज्य स्तर – राज्य अध्यक्ष, राज्य पदाधिकारी,

३. जिल्हा स्तर – जिल्हा अध्यक्ष, स्थानिक कार्यकर्ते

४. महाविद्यालय स्तर – कॉलेज युनिटस्, विद्यार्थी प्रतिनिधी.

NSUI ची ही रचना देशभर प्रभावीपणे काम करण्यास मदत करते.

कार्य व उपक्रम –

शैक्षणिक क्षेत्रात – १. फी वाढीविरोधात आंदोलन, २. विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप योजना वाढवणे, ३. डिजिटल शिक्षण, सुविधांची मागणी.

सामाजिक व जनजागृती – १. महिला

सक्षमीकरण, आंदोलन/कार्यक्रम, २. पर्यावरण संरक्षण मोहीमा, ३. मतदान जागरुकता अभियान.

सेवा कार्य - १. रक्तदान शिबिरे, २. आपत्ती काळात मदत -पूर, भूकंप, ३. गरीब विद्यार्थ्यांना मदत.

कॉलेज स्तरावरील काम - १. हॉस्टेल समस्या सोडवणे, २. परीक्षा व निकालात पारदर्शकता, ३. कॉलेज प्रशासनाशी चर्चा.

**विद्यार्थी राजकारणातील भूमिका :**

NSUI विद्यार्थी राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावते. १ विद्यार्थी निवडणुकामध्ये सहभाग, विद्यार्थ्यांना नेतृत्वाचा अनुभव, भविष्यातील राजकीय नेते तयार करणे.

NSUI चे महत्त्व - विद्यार्थ्यांना आवाज मिळतो, शिक्षण क्षेत्रात सुधारणा होते, समाजात जागरुकता वाढते, युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो, लोकशाही मजबूत होते.

NSUI मधून घडलेले नेते : NSUI मधून अनेक नेते पुढे आले आहेत. ज्यांनी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर मोठी कार्य केले आहे. त्यामुळे NSUI ही नेतृत्वाची शाळा म्हणून ओळखली जाते.

आव्हाने आणि टीका : NSUI ला काही अडचणींचा सामना करावा लागतो.

-राजकीय प्रभावामुळे निपक्षतेवर प्रश्न, इतर विद्यार्थी संघटनांशी संघर्ष, काही ठिकाणा संघटनात्मक कमकुवतपणा, तथापि या आव्हानावर मात करून NSUI सतत कार्यरत आहे.

भविष्यातील दिशा : डिजिटल शिक्षणावर अधिक लक्ष, कौशल्य विकास कार्यक्रम, ग्रामीण भागात अधिक विस्तार, विद्यार्थ्यांसाठी नवीन योजना.

**तुलनात्मक अभ्यास :**

NSUI इतर संघटनांपेक्षा कशी वेगळी आहे-

| घटक | NSUI | इतर संघटना |
|---|---|---|
| विचारधारा | उदारमतवादी | विविध |
| मुख्य फोकस | शिक्षण+सामाजिक न्याय | कधीकधी राजकीय |
| कामाची पद्धत | आंदोलन+चर्चा | काही ठिकाणी फक्त आंदोलन |

हा भाग खूप महत्त्वाचा आहे.

निष्कर्ष : (Topper Style Conclusion)

NSUI ' हे केवळ विद्यार्थी संघटना नसून ती एक सामाजिक व लोकशाही चळवळ आहे. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी संघर्ष करताना ती युवकांना जबाबदार नागरिक बनवते. भविष्यात भारताच्या प्रगतीसाठी NSUI सारख्या संघटनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

■

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य

– जाधव कांचन बालाजी
बी.ए.द्वितीय वर्ष

प्रस्तावना : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कार्य करणारी संघटना असून ती वार्षिक अंकाद्वारे आपल्या कार्याची पारदर्शक माहिती देते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) ही भारतातील एक प्रमुख विद्यार्थी संघटना आहे. तिची स्थापना १९४९ मध्ये झाली असून ती विद्यार्थ्यांच्या हितासाठी कार्य करते.

थोडक्यात माहिती :

पूर्ण नाव – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद. स्थापना – १९४९, मुख्यालय – नवी दिल्ली. स्वरूप – विद्यार्थी संघटना

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे उद्दिष्टः**

१. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांवर काम करणे, राष्ट्रभक्ती त्याबरोबरच सामाजिक जागरुकता वाढवण्याचे कार्य करते. ३. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे, ४. विद्यार्थ्यांना नेतृत्व गुण विकसित करण्यास मदत करणे.

वरील सर्व अखिल भारतीय विद्यार्थी संघटना परिषदेचे महत्त्वाचे उद्दिष्टे आहेत. ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी एक प्रभावी संघटना असून ती शिक्षण, समाज आणि राष्ट्र यांच्यातील दुवा आहे. एबीव्हीपी विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनवून राष्ट्राच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देते.

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रमुख कार्य** :

१. शैक्षणिक कार्य : करिअर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, स्पर्धा परीक्षा (युपीएससी/एमपीएससी) मार्गदर्शन, सेमिनार, कार्यशाळा व अभ्यासक्रम

२. विद्यार्थी समस्यांचे निराकरण : फी वाढ, प्रवेश, परीक्षा यासारख्या प्रश्नांवर आंदोलन, महाविद्यालयीन सुविधा– लायब्ररी, बस, वसतिगृह – सुधारण्यासाठी प्रयत्न, प्रशासनाची चर्चा करून उपाय शोधणे.

३. सामाजिक कार्य– रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, आपत्तीग्रस्तांना मदत – पूर, भूकंप इ.

४. राष्ट्रीय व देशभक्ती उपक्रम –राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रम, देशभक्तीपर रॅली व अभियान, सामाजिक जागरुकता मोहीम.

५. सांस्कृतिक क्रीडा व उपक्रम – स्नेहसंमेलन, नाट्य स्पर्धा, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, वक्तृत्व व निबंध स्पर्धा.

६. नेतृत्व विकास – विद्यार्थ्यांचे नेतृत्वगुण वाढवणे, संघटन कौशल्य विकसित करणे, युवकांना समाजासाठी तयार करणे.

एबीव्हीपी विविध क्षेत्रात कार्य करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवते आणि त्यांना समाज व राष्ट्रासाठी जबाबदार नागरिक बनवते.

बहिर्जी महाविद्यालय वसमत या ठिकाणी या प्रकारचे विविध कार्य पार पाडले जातात. असे कार्य जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवतील

तसेच त्यांना भविष्यामध्ये जबाबदार नागरिक बनवतील.

बहिर्जी महाविद्यालयात एनएसएस कॅम्प, एनसीसी कॅम्प तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, एमपीएससी/युपीएससी यासारख्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, मुलींसाठी विशेष मार्गदर्शन तसेच यावर्षी पार पडलेल्या बँकींग संबंधित मार्गदर्शन अभिभाष्य या प्रकारचे अनेक कार्यक्रम सतत आयोजित केले जातात.

एबीव्हीपीचे महत्त्व : विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढते, लेखनकौशल्य विकसित होते, विद्यार्थ्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळते, विविध क्षेत्रात कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवते, विद्यार्थ्यांना समाज व राष्ट्रासाठी जबाबदार नागरिक बनवते. आजचा विद्यार्थी उद्याचा नेता

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे वैशिष्टये:**

भारतातील सर्वात मोठ्या संघटनांपैकी एक संघटना असून ग्रामीण व शहरी भागात मोठा प्रभाव, विद्यार्थ्यांच्या समस्यांवर सक्रिय भूमिका.

निष्कर्ष : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी महत्त्वाची संघटना आहे. जी शिक्षण, समाज आणि राष्ट्रनिर्माणात योगदान देते.

वार्षिक अंक हा केवळ एक पुस्तक नसून विद्यार्थ्यांच्या विचारांचे, अनुभवाचे आणि सृजनशीलतेचे प्रतिबिंब असतो. तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो. विद्यार्थ्यांच्या या प्रकारच्या चळवळीत समावेश असणे अत्यावश्यक आहे, कारण विद्यार्थी हे भविष्याचे शिल्पकार असतात. या प्रकारच्या संघटनांमुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न, विचार पुढे येतात, त्यांच्यात नेतृत्वगुण, जाणीव विकसित करते, विद्यार्थी संघटना असायलाच पाहिजे, त्या महाविद्यालयातही शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाद्वारे एबीव्हीपी विद्यार्थ्यांना राष्ट्रनिर्माणात सहभागी होण्यासाठी प्रेरीत करते.

विद्यार्थी शक्ती – राष्ट्र शक्ती

■



# अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा इतिहास काय?

**- होळकर वैशाली विश्वनाथ**
बी.ए.प्रथम वर्ष

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) ही भारतातील एक प्रमुख विद्यार्थी संघटना आहे. तिची स्थापना ९ जुलै १९४९ रोजी झाली. या संघटनेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचे हित जपणे, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे आणि राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रसार करणे हा आहे. ABVP ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रेरित संघटना मानली जाते, पण ती स्वतःला स्वतंत्र विद्यार्थी संघटना म्हणून मांडते.

**स्थापना व इतिहास :**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची स्थापना बलराज मधोक आणि इतर राष्ट्रवादी विचारसरणीच्या व्यक्तींनी केली. सुरुवातीला विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक समस्यांवर काम करण्यासाठी व्यासपीठ तयार करण्यात आले.

आज ABVP भारतातील सर्वात मोठ्या विद्यार्थी संघटनांपैकी एक आहे आणि देशभरातील अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये तिची उपस्थिती आहे.

उद्दिष्टे : विद्यार्थ्यांच्या हक्काचे संरक्षण करणे, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवणे, भारतीय संस्कृती व राष्ट्रभावना वाढवणे, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी विकसित करणे.

प्रमुख कार्ये : ABVP वविधि प्रकारच्या उपक्रमांद्वारे कार्य करते.

विद्यार्थी आंदोलन : फी वाढ, भ्रष्टाचार, शैक्षणिक अडचणी यांवरिधात आंदोलन.

शैक्षणिक कार्यक्रम : सेमिनार, कार्यशाळा, स्पर्धा.

सामाजिक सेवा : रक्तदान शिबिर, आपत्ती मदत, स्वच्छता मोहीम.

जागरुकता अभियान : राष्ट्रीय व सामाजिक मुद्यांवर जनजागृती.

संघटनात्मक रचना : ABVPची रचना अनेक स्तरांवर केलेली आहे.

राष्ट्रीय स्तर, राज्य स्तर, जिल्हा व महाविद्यालय स्तर, प्रत्येक स्तरावर कार्यकर्ते संघटनेचे कार्य पुढे नेतात.

ABVP विद्यार्थ्यांना विविध समस्यांवर काम करते. फी वाढ, शिक्षणातील भ्रष्टाचार, वसतिगृह समस्या यांविरोधात ती आंदोलन करते. तसेच सेमिनार, स्पर्धा, कार्यशाळा यांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा विकास घडवते.

ही संघटना सामाजिक कार्यातही सहभागी असते. रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान आणि आपत्ती मदत या कार्यामध्ये सक्रिय असते. भारतातील अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये ABVP कार्यरत आहे. विद्यार्थी निवडणुकांमध्येही ती भाग घेते आणि अनेक ठिकाणी यश मिळवते.

प्रभाव व भूमिका : ABVP चा भारतीय

विद्यार्थी राजकारणात मोठा प्रभाव आहे. अनेक विद्यापीठांमध्ये ती विद्यार्थी निवडणुका लढवते आणि जिंकतेही. शिक्षण धोरण, विद्यार्थी प्रश्न आणि राष्ट्रीय मुद्यांवर ही संघटना सक्रिय भूमिका बजावते.

ABVP वर अनेकदा भारतीय जनता पक्षाशी जवळीक असल्याची टीका होते. काही लोकांच्या मते ही संघटना शिक्षणापेक्षा राजकारणावर अधिक लक्ष केंद्रीत करते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही एक प्रभावी विद्यार्थी संघटना आहे. ती विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी काम करताना राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रसार करते. मात्र तिच्या राजकीय संबंधांबाबत वादही होत असतात. ही संघटना शिक्षण, समाजसेवा आणि राष्ट्रभावना वाढवण्यासाठी योगदान देते.

ABVP ही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी व समाजासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारी संघटना आहे. ही एक प्रभावशाली विद्यार्थी संघटना असून ती शिक्षण, समाजसेवा व राष्ट्रनिर्माणात महत्त्वाचे योगदान देते. विद्यार्थ्यांसाठी कार्य करणारी महत्त्वाची संघटना आहे.

■



# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद : रचना स्वरूप (ABVP)

**– वाघमारे महेश मुंजाजी,** बी.ए.द्वितीय वर्ष

स्थापना व पार्श्वभूमी : ९ जुलै १९४९. स्थापक : बळराज मधोक, मुख्यालय : मुंबई, नंतर दिल्लीला हलवले, संलग्नता : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) च्या प्रेरणेने चालणारी, पण स्वतंत्र संघटना.

आजची स्थिती : भारतातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना, ३५ लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत सदस्य.

स्वरूप व रचना : ब्रीदवाक्य : ज्ञान, शील, एकता, ध्वज : भगवान रंग, मधोमध कमळाचे चिन्ह.

रचना : १. महाविद्यालय इकाई– प्रत्येक कॉलेजमध्ये युनिट, २. नगर/तालुका समिती, ३. जिल्हा समिती, ४. प्रांत/राज्य समिती.

महाराष्ट्रात ३ प्रांत : कोकण, पश्चिम महाराष्ट्र, देवगिरी.

राष्ट्रीय कार्यकारिणी : राष्ट्रीय अध्यक्ष व राष्ट्रीय महामंत्री. सदस्यत्व : कोणताही विद्यार्थी, वय ३५ पर्यंत सदस्य होऊ शकतो. कार्यकर्ता : पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्ते प्रचारक म्हणून ओळखले जातात.

प्रमुख उद्दिष्टे : १. राष्ट्रीय पुनर्निर्माण : राष्ट्रवादी विचारांच्या आधारे विद्यार्थ्यांचे चरित्र निर्माण. २. शैक्षणिक सुधारणा : गुणवत्ता, मूल्याधिष्ठित आणि स्वस्त शिक्षणासाठी लढा. ३. विद्यार्थी हित : फी वाढ विरोध, परीक्षा पद्धती सुधारणा, वसतिगृह सुविधा. ४. सामाजिक जागृती : भ्रष्टाचार, दहशतवाद, फुटीरतावादाविरूद्ध जनजागृती. ५. सांस्कृतिक रक्षण : भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासाचा सन्मान. ६. नेतृत्व विकास : युवकांना सामाजिक व राजकीय नेतृत्वासाठी सक्षम करणे.

प्रमुख कार्य व आंदोलने : १. .... टूर : ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांना उर्वरित भारताशी जोडण्यासाठी Students Experience in inter state living. २. काश्मीर मुद्दा : कलम ३७० हटविण्यासाठी देशभर जनजागृती. ३. बांगलादेशी घुसखोरी : सीमावर्ती राज्यांत एनआरसी साठी मागणी. ४. शैक्षणिक आंदोलने : एफवाययुपी विरोध, एनईपी २०२० चे स्वागत, फी वाढ विरोध. ५. सामाजिक उपक्रम : रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आपत्ती काळात मदतकार्य. ६. थींक आयडीया : युवकांसाठी धोरण, संशोधन आणि राष्ट्रीय विषयांवर व्यासपीठ.

वैशिष्ट्ये : अराजकीय पण राष्ट्रीय : थेट राजकारण करत नाही, पण राष्ट्रहिताच्या मुद्यांवर ठाम भूमिका. निवडणुका : DUSU, JNU सह अनेक विद्यापीठ निवडणुकांमध्ये ABVP सक्रीय सहभाग घेते. महिला सहभाग : छात्रा म्हणून स्वतंत्र महिला विंग सक्रिय आहे. विवाद : JNU, HCU मधील आंदोलनामुळे अनेकदा चर्चेत.

१. तत्वज्ञान आणि विचारधार : एकात्म

मानववाद : दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांवर आधारित व्यक्ती ते समाज सर्वांचा सविकास, सांस्कृतिक राष्ट्रवाद : भारत एक सांस्कृतिक राष्ट्र आहे, ही भूमिका. शिक्षणाचे भारतीयकरण : मेकाले पद्धतीऐवजी भारतीय मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर.

२. संघटनात्मक रचना अधिक तपशील : आयाम : ४ मुख्य कामे. १. शिक्षण क्षेत्र, २. विद्यापीठ काम, ३. सेवा कार्य, ४. कला साहित्य.

प्रकल्प : प्रत्येक राज्यात वेगवेगळे प्रकल्प, उदा. महाराष्ट्रात शिवदर्शन, गडकोट मोहीम, पूर्णवेळ कार्यकर्ता : लग्न न करता पगार न घेता २-३ वर्षे संघटनेसाठी काम करणारे विस्तारक. बैठका : दर महिन्याला शाखा बैठक, वर्षातून एकदा राष्ट्रीय अधिवेशन.

३. महाराष्ट्रातील विशेष काम : देवगिरी प्रांत : मराठवाडा+ उत्तर महाराष्ट्र, मुख्यालय छ.संभाजीनगर

पश्चिम महाराष्ट्र प्रांत : पुणे, कोल्हापूर, सांगली, मुख्यालय पुणे.

कोकण प्रांत : मुंबई, ठाणे, कोकण, मुख्यालय दादर.

मोहीमा : गडकिल्ले संवर्धन, शिवजयंती उत्सव, मराठी भाषा दिन कार्यक्रम.

विद्यार्थी परिषद : दरवर्षी डिसेंबरमध्ये महाराष्ट्र प्रांताचे संमेलन.

■



# छात्रोंका क्रांती आंदोलन

**– इंद्रायणी सतिशकुमार सोनी**
बी.एस्सी. द्वितीय वर्ष

**छात्र आंदोलन : समाज और राष्ट्र के सजग प्रहरी** : प्रस्तावना और अर्थ : छात्र आंदोलन का अर्थ केवल सडकों पर नारेबाजी करना नहीं है, बल्कि यह अन्याय के विरूद्ध युवा चेतना का एक सामूहिक विस्फोट है. विद्यार्थी समाज का वह हिस्सा होते है जो भविष्य के प्रति आशान्वित और वर्तमान की विसंगतियों के प्रति संवेदनशील होते है. जब शिक्षा व्यवस्था, सरकारी नीतिया या सामाजिक ढांचा आम जनमानस के हितों के विपरीत काम करने लगता है, तब छात्र एक संगठित शक्ति के रूप में उभरते है. छात्र आंदोलनो का मूल उद्देश्य समाज में सकारात्मक परिवर्तन लाना, लोकतां९िक मूल्यों की रक्षा करना और एक न्यायपूर्ण व्यवस्था का निर्माण करना होता है. ऐतिहासिक रूप से, छा९ो ने हमेशा सत्ता को आईना दिखाने का काम किया है.

**ऐतिहासिक पृष्ठभूमि और गौरवशाली विरासत** : भारत में छात्र आंदोलन का इतिहास अत्यंत प्रेरणादायी रहा है. स्वतंत्रता संग्राम के दौरान, महात्मा गांधी के आव्हान पर 'असहयोग आंदोलन' (१९२०) और 'भारत छोडो आंदोलन' (१९४२) में हजारों छात्रों ने अपनी पढाई छोडकर सडकों पर उतरकर ब्रिटिश शासन की नींव हिला दी थी. आजादी के बाद भी १९७४ का 'जेपी आंदोलन' (बिहार आंदोलन) छात्र शक्ति का सबसे बडा उदाहरण बना जिसने भ्रष्टाचार और कुशासन के विरूद्ध 'संपूर्ण क्रांति' का नारा दिया और देश की तत्कज्ञालीन केंद्र सरकार को बदलने में निर्णायक भूमिका निभाई. इसी तरह असम आंदोलन और मंडल आयोग के विरोध में हुए प्रदर्शनों ने भारतीय राजनीति के सामाजिक और क्षेत्रीय स्वरूप को गहराई से प्रभावित किया.

**प्रमुख मुद्दे और चुनौतियाँ** : वर्तमान समय में छात्र आंदोलन मुख्य रूप से तीन विषयों पर केंद्रित है. पहला शैक्षणिक सुधार जैसे फीस वृद्धि का विरोध और बेहतर सुविधाएँ, दुसरा – रोजगार और परीखा पारदर्शिता जैसे पेपर लीक (नीट, युपीएससी) और भर्ती में देरी के खिलाफ संघर्ष, और तिसरा सामाजिक न्याय जैसे छात्रवृत्ति और आरक्षण की रक्षा. आज के डिजिटल युग में सोशल मीडिया ने आंदोलनों को और अधिक संगठित बनाया है, लेकिन राजनीतिक हस्तक्षेप और आंदोलनों का दमन आज की बडी चुनौतियां है.

निष्कर्ष : निष्कर्षतः छात्र आंदोलन किसी भी जीवंत लोकतंत्र के लिए 'सेफ्टी वाल्व' की तरह काम करते है. ये सत्ता को निरंकुश होने से रोकते है और समाज को नए, साहसी नेता प्रदान करते है. भारत के कई दिग्गज नेता छात्र राजनीति की ही उपज रहे है. एक अनुशासित और अहिंसक छात्र आंदोलन ही राष्ट्र की प्रगति का असली वाहक है, क्योंकि 'छात्र शक्ति ही राष्ट्र शक्ति है' और यदि युवा पीढी जागरूक होकर संघर्ष करती है, तो वह समाज में समानता, न्याय और प्रगति का मार्ग प्रशस्त कर सकती है.

■

# भारतातील राजकीय आणि सामाजिक चळवळींमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका:

**– सानिया दिलावर खान,** बी.एस्सी. तृतीय

विद्यार्थी म्हणजे केवळ देशाचे भविष्य नसून, ते राष्ट्राचा जिवंत आणि धगधगता विवेक आहेत. सद्यस्थितीला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवून ते देशाच्या वर्तमानाला आकार देत असतात.

भारतीय राजकारणाचा, समाजकारणाचा आणि एकंदर लोकशाहीच्या उत्क्रांतीचा इतिहास हा विद्यार्थ्यांच्या ज्वलंत आदर्शवादाशी, त्यांच्या अथांग संघर्षाशी आणि प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध त्यांनी पुकारलेल्या बंडाशी अतूटपणे जोडलेला आहे. विद्यार्थी केवळ वर्गाच्या चार भिंतीत आणि अभ्यासक्रमाच्या चौकटीत अडकून न राहता, त्यांनी नेहमीच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बदलांचे अग्रभागी राहून नेतृत्व केले आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालये ही केवळ पदवी देणारी आणि नोकरदार वर्ग निर्माण करणारी शिक्षणाची केंद्रे नसून, ती राजकीय जाणिवांची, वैचारिक घुसळणीची आणि राष्ट्रीय चळवळींची उगमस्थाने आहेत. स्वातंत्र्यलढ्यातील राष्ट्रवादाच्या उदयापासून ते आजच्या एकविसाव्या शतकातील नवउदारमतवादी धोरणांना आणि खाजगीकरणाला विरोध करण्यापर्यंत विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत निर्णायक आणि दिशादर्शक राहिली आहे. प्रस्तुत अहवाल हा भारतातील विद्यार्थी चळवळींचा इतिहास, त्यांची बदलती स्वरूपे, त्यांच्या मागण्यांचे सामाजिक संदर्भ आणि भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणात त्यांचे योगदान यांचा अत्यंत सखोल आणि विस्तृत आढावा घेतो.




भारतीय राजकारणातील विद्यार्थ्यांच्या सक्रिय आणि संघटित सहभागाची मुळे ब्रिटिश वसाहतवादाविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात पाहायला मिळतात. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यातून सुरू झालेला हा प्रवास १९४७ च्या सत्तांतरापर्यंत अनेक स्थित्यंतरांमधून गेला. अठराशे सत्तावन्नच्या उठावानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया

कंपनीच्या विस्तारवादी धोरणांमुळे, आर्थिक शोषणामुळे आणि प्रशासकीय हस्तक्षेपांमुळे भारतीय समाजात जो असंतोष खदखदत होता, त्याला संघटित रूप देण्याचे काम शिक्षित तरुण वर्गाने केले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात विद्यार्थ्यांच्या सहभागाची अधिकृत सुरुवात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झाली. एकोणीसशे तीन मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आणि त्यांचे बंधू गणेश दामोदर सावरकर यांनी अभिनव भारत या संस्थेची स्थापना केली, ज्याला यंग इंडिया असेही संबोधले जायचे. इटलीच्या एकत्रीकरणासाठी जोसेफ मॅझिनीने स्थापन केलेल्या यंग इटली या संघटनेच्या धर्तीवर सावरकरांनी भारतीय तरुणांना आणि विशेषतः अभ्यासू विद्यार्थ्यांना संघटित करून ब्रिटिश सरकारविरुद्ध क्रांतीचे बीज रोवले. यातूनच देशात एका प्रखर राष्ट्रवादी आणि क्रांतिकारी विचारांची पेरणी झाली. याच काळात बाळ शिरीषकुमार पासून ते तरुण भगतसिंग यांच्यासारख्या अनेक विद्यार्थी आणि तरुणांनी प्रस्थापित सत्तेला आव्हान देत प्राणांची आहुती दिली. रशियामधील झारविरोधी क्रांती आणि मार्क्सवादी विचारांचा प्रभाव भारतीय तरुणांवर पडत होता, ज्यामुळे देशात भगतसिंग, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस आणि जयप्रकाश नारायण यांच्यासारखे तरुण व तडफदार नेते उदयास आले.

एकोणीसशे पाच मध्ये लॉर्ड कर्झनने केलेल्या बंगालच्या फाळणीविरुद्ध संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. या काळात उभी राहिलेली स्वदेशी चळवळ ही विद्यार्थी शक्तीचा पहिला मोठा आविष्कार होती. बंगालच्या फाळणीनंतर परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे आणि स्वदेशीचा पुरस्कार करणे यात विद्यार्थ्यांची भूमिका अग्रगण्य होती. विद्यार्थ्यांनी ब्रिटिश अनुदानावरील शाळा आणि महाविद्यालयांवर बहिष्कार टाकला, ज्यामुळे राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करण्यास चालना मिळाली. या चळवळीने मवाळ नेत्यांच्या सुधारणावादी धोरणांच्या मर्यादा स्पष्ट केल्या आणि तरुण वर्गाने स्वातंत्र्यासाठी अधिक आक्रमक मार्ग स्वीकारण्यास सुरुवात केली.

महात्मा गांधींच्या आगमनानंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला खऱ्या अर्थाने जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. एकोणीसशे वीस च्या असहकार चळवळीत गांधीजींच्या हाकेला ओढ देऊन हजारो विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालये सोडली आणि ते रस्त्यावर उतरले. यानंतरच्या सविनय कायदेभंग चळवळीत (१९२९-१९३१) विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय होता. विशेषतः दक्षिण भारतात, चेन्नई (मद्रास) येथील पचयप्पा कॉलेज, प्रेसिडेन्सी कॉलेज आणि क्वीन मेरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मद्रास सॉल्ट सत्याग्रह, नील स्टॅच्यू सत्याग्रह आणि वैयक्तिक सत्याग्रहात सक्रिय सहभाग नोंदवून ब्रिटिश सत्तेला हादरवून सोडले. विद्यार्थी केवळ प्रेक्षक राहिले नाहीत, तर त्यांनी ब्रिटिश सनदी सेवा (I.C.S) परीक्षांवरील निर्बंधांविरुद्धही आवाज उठवला.

एकोणीसशे छत्तीस मध्ये अखिल भारतीय पातळीवर विद्यार्थ्यांचे संघटन उभे राहिले, ज्याने विद्यार्थी चळवळीला एक वैचारिक आणि धोरणात्मक चौकट मिळवून दिली. त्यानंतर एकोणीसशे बेचाळीस च्या चले जाव आंदोलनात विद्यार्थ्यांचे योगदान अतुलनीय ठरले. जेव्हा महात्मा गांधींसह सर्व प्रमुख नेत्यांना रातोरात तुरुंगात टाकले गेले, तेव्हा या चळवळीची संपूर्ण धुरा विद्यार्थ्यांनी आपल्या खांद्यावर

घेतली. भूमिगत राहून चळवळीचे नेतृत्व करण्याचे, पत्रके वाटण्याचे, समांतर सरकारे चालवण्याचे आणि क्रांतीची धगधगती मशाल तेवत ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य याच विद्यार्थी वर्गाने केले. गोदावरी परुळेकर यांच्यासारख्या तरुण विद्यार्थिनींनी ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या विद्यार्थी चळवळीतून प्रेरणा घेत स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिले आणि तुरुंगवास पत्करला. पालघरमधील पाचबत्ती चौकात देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण गमावणाऱ्या हुतात्म्यांच्या बलिदानातही तरुण वर्गाचा ज्वलंत आदर्शवाद दिसून येतो.

१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांची भूमिका राष्ट्र उभारणी (Nation-Building) कडे वळेल आणि ते मुख्य प्रवाहातील राजकारणात विधायक काम करतील अशी अपेक्षा होती. साने गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे, ङ्खङ्खज्या गोष्टींना महत्त्व दिले पाहिजे त्यांना कोणीच देत नाही, मुख्य महत्त्व माणुसकीला आहेङ्खङ्ख. याच माणुसकीच्या आणि लोकशाही मूल्यांच्या शोधात विद्यार्थी पुन्हा रस्त्यावर उतरले. जेव्हा जेव्हा प्रस्थापित राजकीय व्यवस्थेत भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी किंवा हुकूमशाही प्रवृत्ती वाढीस लागली, तेव्हा विद्यार्थ्यांनीच लोकशाहीचे रक्षणकर्ते म्हणून देशाला योग्य दिशा दाखवली.

स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात प्रभावी विद्यार्थी आंदोलनांपैकी एक म्हणजे गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन. जानेवारी १९७४ मध्ये अहमदाबाद येथील एल.डी. इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हॉस्टेलच्या मेसच्या वाढलेल्या बिलाविरुद्ध आणि वाढत्या महागाईविरुद्ध संप पुकारला. सुरुवातीला हे आंदोलन केवळ एका महाविद्यालयापुरते आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन समस्यांपुरते मर्यादित वाटत होते. मात्र, या आंदोलनाने एवढे रौद्र रूप धारण केले की त्यात भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या तत्कालीन मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली. या आंदोलनाची रणनीती आणि विद्यार्थ्यांचा रेटा इतका अभूतपूर्व होता की एका शक्तिशाली राज्य सरकारला राजीनामा द्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या या दबावामुळे शेवटी विधानसभा बरखास्त करण्याची नामुष्की प्रस्थापित सत्तेवर ओढवली.

गुजरातच्या नवनिर्माण आंदोलनाने प्रेरित होऊन आणि देशातील एकंदर राजकीय नैराश्याला वाचा फोडण्यासाठी बिहारमधील विद्यार्थ्यांनी बेरोजगारी, वाढती महागाई आणि भ्रष्टाचाराविरुद्ध मोठे आंदोलन उभे केले. या आंदोलनाला योग्य वैचारिक दिशा आणि राष्ट्रीय नेतृत्व देण्यासाठी विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक जयप्रकाश नारायण (जेपी) यांना आमंत्रित केले. जेपींच्या नेतृत्वाखालील या आंदोलनाची संपूर्ण धुरा छात्र संघर्ष समितीच्या खांद्यावर होती. जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांती (Total Revolution) चा नारा दिला, ज्याचा उद्देश केवळ सत्तांतर नसून देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणे हा होता. गांधीजींनंतर अहिंसक मार्गाने देशाची सत्ता बदलण्याचे आणि जनमानसात लोकशाहीची मूल्ये रुजवण्याचे हे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक उदाहरण होते. या आंदोलनाने तरुणांना दलविहीन लोकशाहीचा विचार दिला आणि भारतीय राजकारणाला एक नवी दिशा दिली.

पंचवीस जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू करण्यात आली आणि सर्व नागरी हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. या अंधकारमय काळात हुकूमशाही प्रवृत्तीविरुद्धचा लढा जिवंत ठेवण्याचे आणि लोकशाहीची मूल्ये टिकवून ठेवण्याचे काम विद्यार्थी आणि तरुणांनी केले. पोलिसांच्या लाठ्या खाऊन आणि अनेक महिने तुरुंगवास पत्करून लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी निर्भयपणे लढणाऱ्यांमध्ये तरुण आणि विद्यार्थ्यांचा खूप मोठा वाटा होता. या विद्यार्थी चळवळींनी देशाला एक नवीन राजकीय नेतृत्व दिले, जे पुढील अनेक दशके भारताच्या राजकारणावर प्रभाव टाकणार होते.

३. सामाजिक न्याय, उपेक्षित वर्गाचा लढा आणि विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता

भारतीय समाजातील जातीव्यवस्था, ब्राह्मणी वर्चस्व आणि सामाजिक विषमतेविरुद्धच्या लढ्यात विद्यार्थी चळवळींनी क्रांतिकारी आणि परिवर्तनवादी भूमिका बजावली आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याचा विचार करता, येथील विद्यार्थी आणि युवा चळवळींनी प्रस्थापित वर्चस्ववादाला थेट आव्हान देऊन उपेक्षितांच्या हक्कांसाठी प्राणपणाने लढा दिला आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात प्रदीर्घ, तीव्र आणि सामाजिक अंगाने अत्यंत महत्त्वाच्या विद्यार्थी-प्रणित सामाजिक चळवळींपैकी एक म्हणजे नामांतर आंदोलन. औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी दलित, नवयान बौद्ध आणि पुरोगामी विचारांच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १६ वर्षे हा लढा दिला. डॉ. आंबेडकरांनी मराठवाड्यातील गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे आणि शैक्षणिक संस्था काढून शिक्षणाची दारे खुली केली होती. त्यांच्या संस्थांमधील वसतिगृहांची वैशिष्ट्ये अशी होती की तिथे विद्यार्थी स्वतःचे अन्न स्वतः बनवू शकत असत, ज्यामुळे गरिबीमुळे कुणालाही शिक्षण सोडावे लागू नये याची काळजी घेतली गेली होती. त्यामुळे विद्यापीठाला त्यांचे नाव देणे ही केवळ एक भावनिक मागणी नसून ती सामाजिक समानतेची, ऐतिहासिक न्यायाची आणि आत्मसन्मानाची लढाई होती.

सत्तावीस जुलै १९७८ रोजी महाराष्ट्र विधीमंडळाने विद्यापीठाचे नाव बदलण्याचा ठराव एकमताने संमत केला, परंतु या निर्णयाला सवर्ण आणि सनातनी गटांकडून प्रचंड विरोध झाला. यातून मराठवाड्यात दलितांविरुद्ध भीषण हिंसाचार आणि दंगली उसळल्या. दलितांची घरे जाळण्यात आली, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आणि त्यांच्यावर अमानुष अत्याचार झाले. मात्र, या हिंसक प्रतिरोधाला आणि सामाजिक बहिष्काराला न घाबरता दलित विद्यार्थ्यांनी लोकशाही मार्गाने आपला लढा सुरूच ठेवला. मोर्चे, धरणे, उपोषणे आणि ऐतिहासिक लाँग मार्च यांच्या माध्यमातून त्यांनी प्रशासनावर सातत्याने दबाव आणला.

या आंदोलनाने केवळ राजकीय किंवा प्रशासकीय पातळीवरच नाही तर सांस्कृतिक आणि साहित्यिक पातळीवरही मोठे बदल घडवले. या चळवळीत दलित महिलांचा आणि विद्यार्थिनींचा सहभाग अत्यंत लक्षणीय होता. कवयित्री ज्योती लांजेवार यांच्या आई या कवितेत नामांतर

आंदोलनातील १९७९ च्या लाँग मार्चमध्ये सहभागी झालेल्या, हातात पोलिसांच्या काठीचा मार खाऊनही ''नाव बदला'' अशी घोषणा देणाऱ्या निर्भय दलित स्त्रीचे आणि तिच्या प्रखर संघर्षाचे ओजस्वी चित्रण आहे. उर्मिला पवार यांच्या आयदान सारख्या आत्मकथनातूनही या चळवळीने दलित स्त्रीच्या राजकीय आणि सामाजिक ओळखीला कसा नवा आकार दिला, हे स्पष्ट होते. नामदेव ढसाळ आणि विलास घोगरे यांच्यासारख्या शाहिरांनी आणि कवींनी या आंदोलनातील वेदना, आक्रोश आणि विद्रोह आपल्या साहित्यातून मांडून चळवळीला वैचारिक धार दिली. अखेरीस चौदा जानेवारी १९९४ रोजी राज्य सरकारला तडजोड करावी लागली आणि विद्यापीठाचे नाव ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ'' असे ठेवून नामविस्तार करण्यात आला.

सत्तरच्या दशकात महाराष्ट्रात दलित पँथर्स या आक्रमक युवा आणि विद्यार्थी संघटनेने ब्राह्मणी वर्चस्वाला थेट आव्हान देत शोषित आणि वंचितांच्या हक्कांसाठी रस्त्यावरील लढा उभारला. त्यांनी शैक्षणिक हक्क, जमिनीचे समान वाटप, आरक्षण आणि पोलिसांच्या अत्याचाराविरुद्धच्या मुद्द्यांना राजकीय पटलावर केंद्रस्थानी आणले. याशिवाय, मराठी माणूस मंडळ यांसारख्या चळवळींनी जागतिकीकरण आणि वेगाने वाढणाऱ्या स्थलांतराच्या काळात मराठी भाषेचे आणि प्रादेशिक अस्मितेचे रक्षण करण्यासाठी राजकीय पक्षांना आपली धोरणे बदलण्यास भाग पाडले. या सर्व चळवळी दर्शवतात की विद्यार्थी केवळ स्वतःच्या फी-माफीपुरते मर्यादित न राहता, त्यांनी संपूर्ण समाजाच्या सांस्कृतिक आणि राजकीय हक्कांसाठी व्यापक लढे उभारले आहेत. ■



# विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढणारी संघटना : स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI)

**– पतंगे श्वेता शंकरराव** (एम.कॉम.प्रथम वर्ष)

स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) ही भारतातील एक प्रमुख विद्यार्थी संघटना आहे. तिची स्थापना सन १९७० मध्ये झाली. या संघटनेच्या स्थापनेत P. Sundarayya, E. M. S. Namboodiripad आणि Harkishan Singh Surjeet यांसारख्या नेत्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. ही संघटना विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी कार्य करते. SFI ही प्रामुख्याने डाव्या विचारसरणीवर आधारित असून Communist Party of India (Marxist) या पक्षाशी संबंधित आहे.

SFI चे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सर्व विद्यार्थ्यांना समान, परवडणारे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे. शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवणे, फी वाढीविरोधात आंदोलन करणे, तसेच शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा वाढवण्यासाठी प्रयत्न करणे ही संघटनेची महत्त्वाची कार्ये आहेत.ही संघटना केवळ शैक्षणिक मुद्द्यांवरच नाही तर सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवरही सक्रिय असते. स्त्री–पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक ऐक्य यांचा प्रचार SFI करते. देशातील विविध महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये SFI चे कार्यकर्ते विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी काम करतात.SFI ने अनेक वेळा विद्यार्थी हितासाठी आंदोलने आणि मोर्चे काढले आहेत. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी धोरणात्मक बदल करण्यासाठी SFI सातत्याने प्रयत्नशील आहे.एकूणच, स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया ही विद्यार्थ्यांच्या हक्कांची लढाई लढणारी आणि त्यांना एकत्र आणणारी प्रभावी संघटना आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांना समाजाच्या विकासात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे हे SFI चे मुख्य ध्येय आहे.

घोषवाक्य (Slogan) Study and Struggle (अभ्यास करा आणि संघर्ष करा)हे घोषवाक्य विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आपल्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा देते.

संघटनेची रचना: १) राष्ट्रीय स्तर (National Level):सर्वात उच्च स्तर राष्ट्रीय परिषद (Conference) व केंद्रीय कार्यकारिणी (Central Executive Committee) देशभरातील धोरणे आणि निर्णय येथे घेतले जातात.

२) राज्य स्तर (State Level) :प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य समिती.राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर काम .राज्यस्तरीय कार्यक्रम आणि आंदोलनांचे आयोजन.

३) जिल्हा स्तर (District Level):जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे समन्वय.स्थानिक प्रश्न सोडवणे.विद्यार्थ्यांना संघटनेशी जोडणे.

४)महाविद्यालय /विद्यापीठ स्तर (unit level) :संघटनेचा सर्वात मूलभूत स्तर विद्यार्थ्यांशी थेट संपर्क

महाविद्यालयातील समस्या, निवडणुका आणि उपक्रम हाताळणे.

५)सदस्य व कार्यकर्ते :सामान्य विद्यार्थी सदस्य म्हणून सहभागी होतात.सक्रिय कार्यकर्ते संघटनेचे कार्यक्रम राबवतात.

स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) कार्य

१) शैक्षणिक प्रश्नांवर काम:फी वाढीविरोधात आंदोलन ,गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न,शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवण्यासाठी लढा.

२) विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढा:शिष्यवृत्ती वाढवण्याची मागणी.वसतिगृह, ग्रंथालय, इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न.विद्यार्थ्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे.

३) आंदोलन व जनजागृती:मोर्चे, धरणे, निदर्शने आयोजित करणे.विविध सामाजिक आणि शैक्षणिक विषयांवर जनजागृती करणे.

४) सामाजिक कार्य:स्त्री-पुरुष समानतेचा प्रचार पर्यावरण संरक्षणासाठी उपक्रम सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचा प्रसार.

५) बेरोजगारीविरोधात आवाज:रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी सरकारकडे मागणी तरुणांमध्ये करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे.

६) विद्यार्थ्यांचा विकास:नेतृत्वगुण विकसित करणे.विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.

स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) महत्त्व

१) विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण:SFI विद्यार्थ्यांच्या समस्या मांडते आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देते.

२) गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न:सर्वांना समान आणि चांगले शिक्षण मिळावे यासाठी SFI कार्य करते.

३) सामाजिक जाणीव निर्माण करणे:विद्यार्थ्यांमध्ये समाजाबद्दल जबाबदारी आणि जागरूकता निर्माण करते.

४) लोकशाही मूल्यांचा प्रसार:विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीने विचार करायला आणि सहभाग घ्यायला प्रोत्साहन देते.

५) सामाजिक प्रश्नांवर सहभाग:पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय अशा विषयांवर विद्यार्थ्यांना सक्रिय करते.

६) विद्यार्थ्यांना एकत्र :वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना एकत्र आणून एकजूट निर्माण करते.

महाराष्ट्रातील SFI ने केलेली आंदोलने:

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया SFI ही विद्यार्थी संघटना महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने आंदोलने करत आहे. शिक्षण, रोजगार, समानता आणि विद्यार्थ्यांचे हक्क या मुद्द्यांवर SFI ने राज्यभरात अनेक लढे उभारले आहेत.

वरिल फोटोमध्ये विद्यार्थी NEP Go Back व Reject NEP असे घोषवाक्य देत आहेत.तसेच फी वाढीविरोधात Stop Fee Hike अशी मागणी केली जाते.SFI चे मत आहे की शिक्षण सर्वांसाठी परवडणारे असावे.आंदोलनांमध्ये मोर्चे, घोषणाबाजी आणि निदर्शने यांचा वापर होतो.यातून विद्यार्थ्यांचे हक्क आणि सार्वजनिक शिक्षणाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न दिसतो.

१. फीवाढ विरोधी आंदोलने:महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये वाढणाऱ्या फीच्या विरोधात SFI ने मोर्चे,धरणे आणि निषेध आंदोलने केली.गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना दिलासा

मिळावा यासाठी फी कमी करण्याची मागणी करण्यात आली.काही ठिकाणी प्रशासनाला फीवाढ मागे घ्यावी लागली.

२. शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्यसाठी आंदोलन:विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसल्यामुळे SFI ने शासनाविरोधातआंदोलने केली.SFI विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वितरणात होणारा विलंब थांबवण्याची मागणी केली.शिष्यवृत्ती हा हक्क आहे असा ठाम आवाज उठवला

३. विद्यापीठातील सुविधा सुधारण्यासाठी आंदोलन:अनेक ठिकाणी ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत.SFI ने प्रशासनाला निवेदने देऊन व आंदोलने करून सुविधा सुधारण्यास भाग पाडले.

४. NEET आणि शिक्षण धोरण विरोधी आंदोलन:NEET परीक्षेमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना अडचणी येतात, या कारणावरून SFI ने महाराष्ट्रातही निषेध आंदोलने केली.नवीन शिक्षण धोरण (NEP २०२०) विरोधात राज्यभर मोर्चे काढले.

५. बेरोजगारी विरोधी आंदोलन:शिक्षणानंतर रोजगार मिळावा यासाठी SFI ने राज्य सरकारकडे मागण्या केल्या. रोजगार द्या या घोषणांसह आंदोलने आयोजित केली.

६. सार्वजनिक शिक्षण वाचवा आंदोलन:शिक्षणाचे खाजगीकरण थांबवण्यासाठी SFI ने Save Education मोहिमा राबवल्या.सरकारी शाळा व महाविद्यालये मजबूत करण्याची मागणी केली.

महाराष्ट्रात SFI चे काम विशेषतः खालील मुद्द्यांवर केंद्रित आहे:

फी वाढ विरोध.विद्यापीठातील अनियमितता.विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रश्न . सरकारी शिक्षण संस्थांचे संरक्षण पुणे, मुंबई, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), नाशिक या ठिकाणी SFI चे कार्य सक्रिय आहे.

SFI ची कार्यपद्धती: मोर्चे आणि रॅली  धरणे (Sit-in Protest) घोषणाबाजी (Slogans) विद्यापीठ प्रशासनाचा घेराव ऑनलाइन मोहीम (Social Media Campaigns

SFI चे योगदान:

१.शिक्षण हक्क चळवळ मजबूत केली २.विद्यार्थ्यांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले ३.सामाजिक न्यायासाठी आवाज उठवला ४.लोकशाही मूल्यांचे संरक्षण केले.

SFI ला काही टीकांनाही सामोरे जावे लागते.राजकीय पक्षांशी संबंध असल्याचा आरोप काहीआंदोलनांमध्ये हिंसाचार सर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व न होणे तरीही, संघटना आपल्या उद्दिष्टांवर ठाम राहून कार्य करत आहे.

SFI ही भारतातील एक प्रभावी विद्यार्थी संघटना असून ती शिक्षण, समानता आणि लोकशाही हक्कांसाठी सातत्याने लढा देत आहे.आजच्या काळात शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण, फी वाढ, बेरोजगारी यांसारख्या समस्यांवर SFI ची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांना एकत्र करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे काम ही संघटना करते. ■

# बहुजन स्टूडेंट फ्रंटः शिक्षणातील समावेशकता आणि आरक्षण विषयक चळवळी

**– ज्ञानेश्वरी पवार** (बी.कॉम .प्रथम वर्ष)

Bahujan Students' Front (BSF) ही विद्यार्थी संघटना मुख्यतः बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्कांसाठी कार्य करते. ही संघटना सामाजिक न्याय, समावेशक शिक्षण, आरक्षण, शिष्यवृत्ती, वंचित घटकांचे प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर आंदोलन व जनजागृती करते.

**संघटनेची वैशिष्ट्ये :** सामाजिक न्यायावर भर, संविधान आधारित आंदोलन, शांततापूर्ण मोर्चे, विद्यार्थी हक्कांसाठी कायदेशीर लढा, शिक्षण आमचा हक्क आहे, आरक्षण आमचा संविधानिक अधिकार, सर्वांसाठी समान शिक्षण

**प्रमुख उद्दिष्टे**

शिक्षणातील समावेशकता :Bahujan Students' Front खालील मुद्द्यांवर काम करते:

सर्व घटकांना शिक्षणात समान संधी मिळावी, ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ करणे, सरकारी शाळा व महाविद्यालये मजबूत करणे, फी वाढ रोखणे, गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची मागणी

आरक्षण विषयक चळवळी: Bahujan Students' Front खालील आरक्षण संबंधित मागण्या करते:

शैक्षणिक आरक्षण: SC, ST, OBC विद्यार्थ्यांसाठी आरक्षण कायम ठेवणे, Private शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण लागू करणे, EWS आरक्षणासोबत सामाजिक आरक्षण कायम ठेवणे.

नोकरीतील आरक्षण: Backlog भरती पूर्ण करणे, Contract system बंद करून कायमस्वरूपी भरती, शासकीय भरतीत आरक्षण लागू करणे

वरील चित्रांमध्ये National Education Policy 2020 विरोधातील विद्यार्थी आंदोलन दाखवले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे खाजगीकरण रोखण्याची मागणी करत मोर्चा काढला आहे. Bahujan Students' Front च्या बॅनरखाली विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेले दिसतात. Save Public Education आणि Stop Privatization of Education' असे फलक आंदोलनाचे मुख्य संदेश दर्शवतात. विद्यार्थ्यांनी शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे ठळकपणे मांडले आहे. आंदोलनात सामाजिक न्याय आणि समान शिक्षण संधीची मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थी हातात घोषवाक्य असलेले पोस्टर घेऊन शांततापूर्ण मोर्चा करताना दिसतात. शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात आली आहे. या आंदोलनात बहुजन आणि वंचित घटकांच्या शिक्षण हक्कांवर भर देण्यात आला आहे.

एकूणच ही विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्कांसाठी आणि NEP विरोधातील संघर्ष दर्शवतात.

| वर्ष | आंदोलन / चळवळ | मुख्य मागणी | ठिकाण | परिणाम / वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|
| २०१६ | रोहित वेमुला न्याय आंदोलन | शिक्षणातील भेदभाव बंद करणे | महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे | सामाजिक न्याय विषयावर मोठी विद्यार्थी चळवळ |
| २०१७ | शिष्यवृत्ती विलंब विरोध आंदोलन | Post-Matric Scholarship त्वरित देणे | मुंबई, पुणे | सरकारकडून शिष्यवृत्ती वितरण गतीमान |
| २०१८ | फी वाढ विरोध आंदोलन | महाविद्यालयातील फी वाढ रद्द करणे | पुणे, नागपूर | काही ठिकाणी फी वाढ स्थगित |
| २०१९ | Backlog भरती आंदोलन | आरक्षणातील रिक्त जागा भरणे | मुंबई, औरंगाबाद | शासनाला निवेदन सादर |
| २०२० | NEP २०२० विरोध आंदोलन | शिक्षणाचे खाजगीकरण रोखणे | ऑनलाइन + महाराष्ट्र | विद्यार्थी संघटनांची संयुक्त चळवळ |
| २०२१ | ऑनलाइन शिक्षण सुविधा आंदोलन | गरीब विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा | पुणे, नांदेड | काही विद्यार्थ्यांना मदत योजना |
| २०२२ | विद्यापीठ प्रतिनिधित्व आंदोलन | विद्यार्थी परिषदेत बहुजन प्रतिनिधित्व | नागपूर, मुंबई | प्रतिनिधित्व वाढवण्याची मागणी |
| २०२३ | Hostel व Scholarship आंदोलन | वसतिगृह सुविधा वाढवणे | पुणे, औरंगाबाद | प्रशासनाशी चर्चा |
| २०२४ | सरकारी शिक्षण वाचवा आंदोलन | सरकारी कॉलेज मजबूत करणे | महाराष्ट्रभर | विद्यार्थी मोर्चे |
| २०२५ | आरक्षण बचाव आंदोलन | शिक्षण व नोकरीत आरक्षण कायम ठेवणे | पुणे, मुंबई | मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभाग |

१. फी वाढ विरोधी आंदोलन: सरकारी महाविद्यालयातील फी वाढ विरोध, विद्यार्थी मोर्चे आणि निवेदन

२. शिष्यवृत्ती विलंब विरोध आंदोलन : Post-Matric Scholarship वेळेवर देण्याची मागणी, सामाजिक न्याय विभागाकडे आंदोलन

३. NEP २०२० विरोध आंदोलन: शिक्षणाचे खाजगीकरण विरोध, आरक्षण कमी होण्याची भीती

४. विद्यापीठातील प्रतिनिधित्वासाठी आंदोलन: विद्यार्थी परिषदेत बहुजन प्रतिनिधित्व, शिक्षक भरतीत आरक्षण

**महाराष्ट्रातील सक्रिय क्षेत्र :** Bahujan Students' Front खालील भागात सक्रिय आहे: पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, नांदेड, लातूर

■

# दिव्या शिंदे सरकार एक आधुनिक विद्यार्थी चळवळ

– संतोष हिरामण खंदारे

बीए तृतीय वर्ष, समाजशास्त्र विभाग

सामाजिक बदलाचे साधन म्हणून, विद्यार्थी चळवळ आपल्या भारत देशामध्ये अनेक सामाजिक बदल घडवून आणले आहेत. "विद्यार्थी चळवळ" ही समाजातील बदलाची एक प्रभावी व गतिमान शक्ती राहिली आहे. विद्यार्थी वर्ग हा समाजातील ऊर्जा आणि बौद्धिक जाणिवेचे प्रतिनिधित्व करतो. बदलाची तातडी आणि त्या विषयावरील हक्कांची भावना जागृत करण्यामध्ये विद्यार्थ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

विद्यार्थी चळवळीत विद्यार्थ्यांनी जातीय भेद, आर्थिक विषमता, भ्रष्टाचार, पर्यावरण संरक्षण, शिक्षणाचा अधिकार इत्यादी अनेक प्रश्नांवर आवाज उठवून शासन व प्रशासनावर योग्य निर्णय घेण्यासाठी दबाव निर्माण केला. त्यांनी संघर्ष करून सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा दिला.

आजचे उदाहरण सांगायचे झाले, तर आपण दिव्या शिंदे यांचे देऊ शकतो. त्या आंबेडकरी चळवळीतील विद्यार्थी नेत्या आहेत. त्यांनी शैक्षणिक संस्थांमधील जातीय भेदभाव, शिष्यवृत्ती आणि प्रतिनिधित्व यांसारख्या प्रश्नांवर आवाज उठविला आहे आणि आजही उठवत आहेत. दिव्या शिंदे 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या आंबेडकरी विचारांचा प्रचार करतात. आंबेडकरी चळवळीत स्त्री नेतृत्वाला बळकटी देण्याचे काम त्या करतात. जात, वर्ग आणि लिंगभेद यांना एकत्रितपणे आव्हान देणे हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. सोशल मीडियासारखी आधुनिक साधने वापरून त्या चळवळ व्यापक करतात. पुण्यातील अनेक कॉलेजमध्ये त्यांनी विद्यार्थी आंदोलन करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांना 'भीम कन्या सरकार' या नावानेही ओळखले जाते. त्या कायद्याच्या अभ्यासक (लॉ स्टुडंट) आहेत. त्यांच्याबद्दल विशेष सांगायचे म्हणजे त्या सामाजिक कार्यकर्त्या, राजकारणी तसेच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आहेत. त्या Bigg Boss Marathi या कार्यक्रमातही सहभागी झाल्या होत्या. त्या म्हणतात, "शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून स्वतःचा सन्मान निर्माण करण्यासाठी असते."

दिव्या सुनील शिंदे (सरकार) एक लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या, आणि तीव्र वक्ता म्हणून ओळखल्या जातात. सध्या पुण्यातील कॉलेज आंदोलनामुळे आणि त्यांच्या आक्रमक भाषणांमुळे त्या प्रसिद्ध त्यांच्या झाल्या आहेत. सामाजिक प्रश्नांवर स्पष्ट मते मांडण्यामुळे त्यांना सोशल मीडियावर 'सरकार' म्हणून ओळखले जाते.

**दिव्या शिंदे (सरकार)‸ जीवन आणि परिचय**

दिव्या सुनील शिंदे महाराष्ट्रातील एक धाडसी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि सामाजिक कार्यकर्त्या आहे.

त्या आंबेडकरी चळवळीशी जोडलेली असून विद्यार्थ्यांचे हक्क, शैक्षणिक समस्या आणि सामाजिक-राजकीय विषयांवर आक्रमकपणे मांडणी करतात. स्पष्ट

संवादकौशल्य आणि प्रभावी भाषणकौशल्य हे त्यांचे बलस्थान आहे. "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या घोषणांचा प्रभाव त्यांच्यावर आंबेडकरी विचारसरणीतून झालेला आहे. त्यामुळे त्या सोशल मीडियावर तरुणांमध्ये लोकप्रिय आहे.

**नववंचितांतील सहभाग व लोकप्रियता :**

दिव्या शिंदे आंदोलनांद्वारे भाषण व कृतीतून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करते. त्यांचे धाडसी वक्तव्य आणि सामाजिक कार्यामुळे त्यांना 'सरकार' ही ओळख मिळवून देते आणि लोकप्रियता वाढवते. दिव्या शिंदे यांची सध्या ओळख ही एक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ती आणि युवा नेत्या म्हणून आहे. त्यांच्या कार्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये अशी :

**अन्यायाविरुद्ध आवाज :**

शैक्षणिक, वंचित आणि वंचित घटकांच्या समस्यांवर ठोसपणे त्या नेहमीच आक्रमकपणे उभ्या राहतात.

**प्रभावी वक्तृत्व :**

त्यांच्या बोलण्याची शैली अत्यंत प्रभावी असून श्रोत्यांवर तीव्र परिणाम करणारी आहे. त्यांच्या भाषणांमुळे तरुणांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण होते.

**विद्यार्थी नेतृत्व :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अधिकारांसाठी लढण्यासाठी त्या नेहमी तत्पर असतात.

**ग्रासरूट्स भावना :**

त्या नेहमीच सर्वसामान्य जनतेसाठी उभ्या राहून त्यांच्या अडचणी समजून घेतात आणि सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी मदत करतात.

शेवटच्या सांगण्याचे तर, दिव्या शिंदे (सरकार) या केवळ एक सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर नसून त्या महाराष्ट्रातील धाडसी तरुण नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करतात. "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या विचारांवर आधारित सामाजिक कार्य करून त्या समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. भविष्यात त्या महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात मोठी भूमिका बजावतील, यात शंका नाही.



# Akhil Bharatiya Vidyarthi Parishad (ABVP) : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

– **क्रांती बी. वीर,** बी.एस्सी. तृतीय

Akhil Bharatiya Vidyarthi Parishad (ABVP) ही भारतातील सर्वात मोठ्या आणि प्रभावशाली विद्यार्थी संघटनांपैकी एक मानली जाते. 1949 साली स्थापन झालेली ही संघटना आज देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना एकत्र आणून शिक्षण, राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक जबाबदारी यासाठी कार्य करते. ''ज्ञान, शील आणि एकता'' या तत्त्वांवर आधारित ABVP विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते.

ABVP चे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करणे नसून त्यांना जबाबदार नागरिक बनवणे आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारावी, विद्यार्थ्यांचे हक्क संरक्षित राहावेत आणि युवकांमध्ये राष्ट्रीय भावना दृढ व्हावी यासाठी संघटना सातत्याने प्रयत्न करते. विविध महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये ABVP विद्यार्थ्यांच्या समस्यांवर आवाज उठवते, जसे की फी वाढ, परीक्षा पद्धतीतील त्रुटी, निकालातील विलंब इत्यादी.

